## नेमणे आहे

नामवंत दै. ‘जनता आवाज’ वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्कः- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ११६ बुधवार, दि. १८ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सितारात थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334

## संमिश्र

### विमान अपघाताच्या ठिकाणी सापडले सोने

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहमदाबाद :** अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या १७१ विमानाचा ज्या ठिकाणी अपघात झाला, त्या ठिकाणाहून ८० तोळे सोने, ८०,००० रोख, एक मोबाईल फोन, भगवद्गीतेची प्रत, ९ पासपोर्ट आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. याशिवाय दागिने, रोख रक्कम आणि पासपोर्ट देखील सापडले. हे सर्व सरकारी अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात आले आहे. ४-५ बॅगा देखील देण्यात आल्या आहेत.

### ..अखेर बडगुजरांनी केला भाजपात प्रवेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** नाशिक येथील शिवसेना ठाकरे गटाचे मोठे नेते सुधाकर बडगुजर यांनी मोठे शक्तिप्रदर्शन करत मुंबई येथील भाजप कार्यालयात जाऊन पक्ष प्रवेश केला आहे. यावेळी हजारोंच्या संख्येने बडगुजर यांचे कार्यकर्ते उपस्थित होते. नरीमन पॉइंट येथील भाजप कार्यालयाच्या रस्त्यावर ढोल ताशे वाजवत हजारो कार्यकर्त्यांसह सुधाकर बडगुजर उपस्थित झाले होते. त्यानंतर भाजप कार्यालयात त्यांनी प्रवेश केला. परंतु यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व रवींद्र चव्हाण हे लवकर न पोहोचल्याने सुधाकर बडगुजर यांना ताटकळत थांबावे लागल्याचे दिसून आले.

### १३ वर्षांच्या मुलाची गळा चिरून हत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यातील खर्ची गावात एक धक्कादायक घटना घडली आहे. १३ वर्षीय तेजस महाजन या मुलाची गळा चिरून हत्या करून त्याचा मृतदेह फेकून दिल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, ही हत्या नरबळीसाठी करण्यात आली का? असा संशय ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. सध्या पोलिसांकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

### आरोपी मनीषा मुसळेच वळसंगकरांची आत्महत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोलापूर :** सोलापूर येथील प्रसिद्ध न्युरोफिजिशियन डॉ. शिरीष वळसंगकर यांनी आत्महत्या केली होती. त्यांच्या आत्महत्येनंतर जवळपास ५९ दिवसांनी पोलिसांनी आरोपी मनीषा मुसळेच्या विरोधात ७२० पानांचे दोषारोपपत्र दाखल केले आहे.




# इराणचा इस्त्रायलवर हल्ला

- इस्त्रायलच्या मोसादवर इराणचा हल्ला
- इराणी सैन्याच्या डेप्युटी कमांडरची हत्या
- २२४ ठार, तर १,४८१ जण जखमी

जनता आवाज वृत्तसेवा

**तेहरान : इस्त्रायल आणि इराणमधील संघर्ष पाचव्या दिवशीही सुरू आहे. मंगळवारी इराणने तेल अवीव येथील इस्त्रायलच्या गुप्तचर संस्थेच्या मोसादच्या मुख्यालयावर हवाई हल्ला केला. याशिवाय लष्करी गुप्तचर संस्थेशी संबंधित अमान या गुप्तचर संस्थेच्या इमारतीलाही लक्ष्य करण्यात आले आहे. इस्त्रायलच्या हवाई हल्ल्यात इराणचे सर्वोच्च लष्करी अधिकारी मेजर जनरल अली शादमानी यांचा मृत्यू झाला आहे. शादमानी हे इराणच्या खातम-अल-अंबिया मुख्यालयाचे लष्करी आपत्कालीन कमांडचे प्रमुख होते. त्यांनी केवळ ४ दिवसांपूर्वीच हे पद स्वीकारले होते.**



इस्त्रायली हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या मेजर जनरल गुलाम अली रशीद यांच्या जागी त्यांना ही जबाबदारी देण्यात आली होती. रशीद यांचे गेल्या शुक्रवारी निधन झाले. इस्त्रायली हल्ल्यात आतापर्यंत २२४ इराणी नागरिक ठार झाले आहेत, तर १,४८१ जण जखमी झाले आहेत. त्याच वेळी, इस्त्रायलमध्ये आतापर्यंत २४ जण ठार झाले आहेत, तर ६०० हून अधिक जण जखमी झाले आहेत.

इस्त्रायलच्या हल्ल्यामुळे इराणच्या नतान्झ अणुऊर्जा केंद्राच्या भूमिगत भागाचे नुकसान झाले आहे, असे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने म्हटले आहे. आयएईएने एक्सवरील एका पोस्टमध्ये लिहिले आहे की, उपग्रह प्रतिमांच्या विश्लेषणातून नतान्झ येथील भूमिगत हॉलवर परिणाम दिसून आला. इस्फहान आणि फोर्डोच्या आधी आणि नंतरच्या छायाचित्रांमध्ये कोणताही दृश्यमान बदल दिसत नाही.

इस्त्रायलने म्हटले आहे की, त्यांनी अद्याप इराणच्या फोर्डो अणुतळावर हल्ला केलेला नाही. एका इस्त्रायली लष्करी अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर इस्त्रायली माध्यमांना ही माहिती दिली.

### इराणची सेवा ठप्प

इराणच्या बँक सेपाहवर सायबर हल्ला झाला, ज्यामुळे ऑनलाइन सेवा ठप्प झाल्या आहेत. इराणच्या सायबर सुरक्षा कमांडने बँक अधिकाऱ्यांची माहिती आणि त्यांच्या सुरक्षा तपशीलांना लक्षात घेऊन सर्व कनेक्टेड डिव्हाइसेसचा वापर करण्यास बंदी घातली आहे.

### वाटाघाटी करायच्या नाहीत : ट्रम्प

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की ते इराणशी वाटाघाटी करण्याच्या मनःस्थितीत नाहीत. तथापि, त्यांनी यापूर्वी म्हटले होते की त्यांना इस्त्रायल आणि इराणमधील संघर्ष संपावा असे वाटते. त्यांनी म्हटले होते की ते अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हेन्स आणि अमेरिकेचे मध्य पूर्व राजदूत स्टीव्ह विटकॉफ यांना चर्चेसाठी पाठवू शकतात. नंतर, त्यांनी स्पष्ट केले की त्यांना इराणशी जास्त वाटाघाटी करायच्या नाहीत. ट्रम्प म्हणाले, मी असे म्हटले नव्हते की इराण आणि इस्त्रायलमध्ये युद्धबंदी असावी. मला इराणसोबतच्या अण्वस्त्र समस्येवर कायम स्वरूपी तोडगा हवा आहे. मला इराणने अण्वस्त्रे पूर्णपणे सोडून द्यावीत असे वाटते.

# कृषीसाठी एआय धोरण मंजूर

**राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा निर्णय**



**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची महत्त्वाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत कृषीसाठी एआय धोरण मंजूर करण्यात आले. सोबतच आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुपटीने वाढ करण्यात आली. इतकेच नाही तर ह्यात आता जोडीदारालाही मानधन मिळेल.

तसेच धारावी पुनर्विकास प्रकल्पातील कंपनीला भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

ट्रायबल इंडस्ट्रियल क्लस्टरसाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नाशिक जिल्ह्यातील जांबुटके येथील २९ हेक्टर ५२ आर जमीन. आदिवासी समाजातील होतकरू उद्योजकांना प्रोत्साहन, रोजगार निर्मिती व आर्थिक विकासास चालना मिळणार. एमएमआरडीए आणि मेसर्स रायगड पेण ग्रोथ सेंटर लि. यांच्या संयुक्त प्रकल्पासाठी आवश्यक जमिनीवरील मुद्रांक शुल्कात सवलत.

सार्वजनिक, खासगी भागिदारीतून हा राज्यातील पहिलाच मोठा प्रकल्प. ग्रोथ सेंटरमुळे विदेशी गुंतवणूक आकर्षित होणार.

### पुनर्विकास योजनेला गती लाभणार

मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले आहे. हा लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनर्वसन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार असल्याचे सरकारने म्हटले आहे. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार असल्याचा दावाही करण्यात येत आहे.

मुंबईतील महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठासाठी आवश्यक पहाडी गोरेगाव येथील जमिनीच्या हस्तांतरणावरील मुद्रांक शुल्क माफ. विद्यापीठाला स्व-मालकीची इमारत मिळणार. हजारो विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार.

धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनीआणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्क माफ. लोकहितार्थ मोठा प्रकल्प असल्याने, पुनवर्सन व पुनर्विकास योजनेला गती लाभणार. योजनेची अंमलबजावणी सुलभ रीतीने होणार. केंद्र सरकारच्या प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्रांची उभारणी करण्यात येणार. यासाठी महावेध प्रकल्पास मुदतवाढ देण्याचा निर्णय. राज्यातील सर्व गावांमध्ये हवामान विषयक पान ४

# ...अखेर ‘राष्ट्रवादी’च्या युतीला पूर्णविराम?



**जनता आवाज वृत्तसेवा**

**बारामती :** गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात दोन मोठ्या युती होणार असल्याची चर्चा रंगली आहे. शिवसेना ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहेत. तर दुसरीकडे राष्ट्रवादीचे पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरु होत्या. मात्र आता या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. संधीसाधूपणा करणाऱ्यांसोबत जाणार नाही, असे शरद पवारांनी म्हटले आहे. त्यावर आता अजित पवारांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

शरद पवार म्हणाले की, पिंपरी चिंचवडमध्ये राष्ट्रवादीचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी शरद पवार यांनी अजित पवारांसोबत जाण्याच्या चर्चांवर स्पष्ट वक्तव्य केले. अनेक लोक वेगळ्या विचाराचे आहेत. कुणी तरी आता म्हणालं सर्वांना बरोबर घ्या. सर्वांना बरोबर घ्यायला हरकत नाही. पण सर्व म्हणजे कोण? गांधी, नेहरू यांचा विचार आणि फुले, शाहू, आंबेडकरांचा विचार मानत असेल तर त्यांनासोबत घेणं मान्य आहे.

पण सत्तेसाठी भाजपसोबत जाऊन बसायचं ही भूमिका कुणी मांडत असेल तर हा काँग्रेसचा विचार नाही. त्यामुळे कुणाशीही संबंध ठेवा. त्यादृष्टीने पावलं टाकायचं आहे. आम्ही संधीसाधूंसोबत जाणार नाही, असे शरद पवार म्हणाले. आता यावर अजित पवारांची प्रतिक्रिया दिली की, प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे एकीकरण होणार नसल्याचं स्पष्ट झाले आहे.

# महानगर बँकेला प्रगतिपथावर न्या

## आ. काशिनाथ दाते; पारनेरमध्ये संचालकांची आभार सभा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** सहकारी संस्थांचा कर्ज वसूली हा आत्मा असून महानगर बँकेच्या सर्व संचालकांनी एकसंघ राहून बँकेला एका वेगळ्या उंची वर न्यावे, असे प्रतिपादन आ. काशिनाथ दाते यांनी केले आहे.

जीएस महानगर बँकेच्या नुकत्याच संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणूकीत बँकेच्या नूतन अध्यक्षा सॉलिसिटर गुलाबराव शेळके संस्थापक पॅनलने सर्वच्या सर्व १९ जागांवर विजय मिळविल्याने व प्रचाराची पारनेर तालुक्यातील निघोज येथे पहिली व शेवटची नववी प्रचार सभा पारनेर येथे घेण्यात पान ४



### सर्वांची साथ लाभली : गितांजली शेळके

जीएस महानगर बँक निवडणुकीत खा. निलेश लंके, आ. काशिनाथ दाते यांच्या राज्यातील मंत्री, खासदार, आमदार यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी मोलाची साथ दिली. बँकेचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांची संस्काराची शिदोरी आणि दिवंगत ॲड. उदयराव शेळके यांची बँक चालवण्याची सचोटी व हातोटी यांचा आम्ही आधार घेऊन पारदर्शक कारभार करणार आहे, असे जीएस महानगर बँकेच्या अध्यक्षा गितांजली शेळके यांनी सांगितले.

# गुहातील हॉटेलात आढळले शिजलेले गोमांस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** राहुरी तालुक्यातील गुहा येथे नगर-मनमाड मार्गावर असलेल्या दोन हॉटेलमध्ये गोवंशीय जातीचे शिजलेले मांस मिळून आले आहे. हा धक्कादायक प्रकार हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे उघडकीस आला आहे.

या प्रकरणी ६ हजार ७५० रुपयांचे ४५ किलो गोवंश जातींचे मांस जप्त करून हॉटेल मालकाविरुद्ध राहुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.



१५ जून रोजी राहुरी पोलीस ठाण्यात पोलिस हेड कॉन्स्टेबल बाबासाहेब शेळके, पोलीस नाईक प्रविण आहीरे, पोलिस कॉन्स्टेबल अंकुश भोसले ड्युटीवर असताना नगर-मनमाड जाणारे रोडच्या कडेला गुहा शिवारातील हॉटेल राणी मेवात व हॉटेल मेवात मांस विक्री करण्यात येत असल्याचा डायल ११२ वर कॉल आला असता पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पान ४

# काँग्रेस, राष्ट्रवादी आणि उबाठाकडे माणसे राहणार नाहीत: ना.महाजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** आम्हालाही पक्ष वाढवायचा आहे. महापालिकेच्या निवडणुका ताकतीने लढवायच्या अहेत. त्यामुळं आता काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांच्याकडे माणसं राहणार नाहीत असं वक्तव्य मंत्री गिरीश महाजन यांनी केलं आहे. ज्यांना पक्षात घेतले ते देखील निवडून आले आहेत. काही जेष्ठ आहेत. आपापसातले काही वाद असतील तर ते मिटतील असंही गिरीश महाजन म्हणाले. आमच्याकडे मंत्री असलेल्ले अनेकजण मागच्या काळामध्ये टीका करत होते. मात्र आता एकरूप झाले आहेत. आता कळत नाही ते दुसऱ्या पक्षात होते असेही ना. महाजन म्हणाले.



### उत्तर महाराष्ट्रामध्ये मोठे पक्ष प्रवेश होणार

माझं कुणावर विशेष प्रेम नाही, माझं माझ्या पक्षावर प्रेम आहे आणि त्याच्या वाढीसाठी मी काम करत आहे. अजून उत्तर महाराष्ट्रामध्ये बघा, मोठे पक्ष प्रवेश करणार आहे. तुमच्याकडे कोणी राहायला तयार नाही. संजय राऊत बोलतात, म्हणून लोकं राहायला तयार नाहीत. मी आधीही उद्धवजींना सांगितलं होतं, पक्ष बुडेल, असे ना. गिरीश महाजन म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर मनपरिवर्तन होऊन ठाकरे गटात नाराज असल्याचा प्रबळ आंतरिक जाणीव झालेले सुधाकर बडगुजर यांनी काल भाजपमध्ये प्रवेश केला. मुंबईच्या नरिमन पॉईंट येथील भाजप मुख्यालयात त्यांचा पक्षप्रवेश झाला. सुधाकर बडगुजर काल सकाळी आपल्या हजारो कार्यकर्त्यांना घेऊन मुंबईच्या दिशेने रवाना झाले होते. मात्र, आता त्यांच्या गाड्या अर्ध्या रस्त्यात असताना भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी चक्रावून टाकणारे विधान केले आहे. सुधाकर बडगुजर यांच्या पक्षप्रवेशाविषयी माझ्याकडे कोणतीही माहिती नसल्याचे बावनकुळे यांनी म्हटले होते.

### जप्त केलेले वाळूचे डंपर तहसील कार्यालयातून पळविले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव तहसील कार्यालयाच्या आवारातील जप्त केलेले वाळूचे डंपर पळवणारा तुकाराम विखे यांच्यावर शेवगावचे प्रभारी तहसीलदार दीपक कारखिले यांनी गुन्हा नोंदविला आहे. एकंदरीतच गेल्या काही दिवसांपासून शेवगाव तहसील कार्यालयाची सुरक्षितता धोक्यात आली असल्याची चर्चा आहे. तहसीलदार कारखिले यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रतिबंध करणे कामी पाच लाख रुपये किंमतीचा दोन ब्रास वाळू भरलेला पांढऱ्या रंगाचा डंपर महसूल अधिकाऱ्यांनी जप्त केला होता. तो वाळूचा डंपर १४ जूनच्या पहाटे पावणेदोन वाजण्याच्या सुमारास शेवगाव तहसील कार्यालयाच्या आवारातून तुकाराम विखे (रा. सोन विहीर, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर) याने पान ४

# आमदारांचा पाठपुरावा तर सभापतींचा खोडा

## कर्जतच्या क्रीडा संकुलावरुन रंगली राजकीय कुस्ती; आ. रोहित पवार यांनी घेतली महसूलमंत्र्यांची भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** आ. रोहित पवार यांच्या पाठपुराव्याने कर्जत तालुक्यातील क्रीडा संकुलाच्या अंतिम मान्यतेसाठी महसूल मंत्रालयात आलेली फाईल प्रलंबित असताना ती मंजूर करण्याऐवजी आता या क्रिडा संकुलासाठीची जागाच बदलण्याचा घाट विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी घातला आहे. याबाबत आ. रोहित पवार यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेवून जागा न बदलता प्रलंबित असलेली फाईल मंजूर करण्याची मागणी केली आहे.

राज्यात महाविकास आघाडीची सत्ता गेल्यापासून कर्जत-जामखेडमध्ये प्रत्येक विकास कामांत राजकारण रंगत असल्याचे दिसत आहे. आमदार झाल्यानंतर कर्जत-जामखेड मतदारसंघात विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचा आणि विकासकामे करण्याचा प्रयत्न आ. पवार यांच्याकडून होत आहे. यामध्ये रस्त्यांपासून तर विविध शासकीय इमारतींपर्यंत आणि पाणीपुरवठ्यापासून तर आरोग्य सुविधांपर्यंत अनेक गोष्टींचा समावेश आहे. याचाच भाग म्हणून त्यांनी कर्जतमध्ये क्रीडा संकुल उभारणीसाठी ६.३ कोटी रुपयांना मंजुरी आणली. मात्र क्रीडा संकुलासाठी योग्य आणि पुरेशी जागा नसल्याने त्यांनी (बर्गेवाडी) येथील जागा मिळण्यासाठी २०२२ पासून पाठपुरावा केला. त्यानुसार या जागेचा तालुका क्रीडा समितीने जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव दिला. तो विभागीय आयुक्तांकडे पाठवण्यात आला आणि विभागीय आयुक्तांनी तो मंजुरीसाठी शासनाकडे पाठवला. मंत्रालय स्तरावर या प्रस्तावाला क्रिडा, वित्त व नियोजन या तिन्ही विभागाने मंजुरी दिली. त्यानंतर अंतिम मान्यतेसाठी हा प्रस्ताव विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे गेला, परंतु, त्यांनी यावर कोणताही निर्णय घेतला नाही. पान ४



अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त मंत्रिमंडळाची नुकतीच बैठक झाली. या बैठकीतच कर्जत-जामखेड मतदारसंघातील प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्याची मागणी आ. पवार यांनी केली होती. परंतु त्यावेळी या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली नाही आणि आता जागा बदलण्याची मागणी सत्तेत असलेल्या सभापतींकडून केली जात असल्याने पाठपुरावा आमदाराचा आणि खोडा घालतात, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राजकारणापायी कर्जत-जामखेडच्या एमआयडीसीला ज्याप्रमाणे ब्रेक लागला, तसे या क्रीडा संकुलाबाबत होऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांकडून केली जात आहे.

मतदारसंघात युवांना अद्ययावत क्रीडा सुविधा मिळाव्यात, यासाठी माझा सातत्याने प्रयत्न सुरु आहे. कर्जतच्या क्रीडा संकुलासाठीही २०२२ मध्ये भरीव निधी मंजूर करुन आणला. परंतु, पुरेशी आणि योग्य जागा नसल्याने बर्गेवाडी येथील जागेसाठी प्रयत्न सुरु आहेत. याबाबतचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी महसूल विभागाकडे असताना आणि महसूलमंत्री सकारात्मक असताना केवळ राजकीय विरोधक सत्तेच्या बळावर त्यात आडकाठी आणत असतील तर ते कर्जत-जामखेडच्या विकासाचे शत्रू आहेत. जागा बदलाची मागणी आज ते करतात. पण आजपर्यंत त्यांनी याबाबत काय पाठपुरावा केला? एखाद्या कामात काडीचंही योगदान नसताना दुसऱ्याच्या कामात मात्र आडवा धोंडा आणणं, हे घटनात्मक पदावरच्या व्यक्तीला शोभणारे नाही.

**-रोहित पवार, आमदार**

# ऋणानुबंध कॉलनीत स्वच्छतेचा बोजवारा

## चक्क दोन महिन्यापासून स्वच्छताच नाही; स्वच्छता करण्याची नागरिकांकडून मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगरमधील कचरा हा गंभीर प्रश्न बनत चालला आहे. सावेडीतील समर्थ शाळेमागे ऋणानुबंध कॉलनी कचऱ्याची समस्या गंभीर बनली असून गेली दोन महिने येथे स्वच्छता करण्यात आली नाही, झाडून घेणे, साफसफाई नित्य करणे हे होत नाही येथे शाळेतील मुले खेळतात. त्यांना व रहिवाश्याना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

मनपाने पूर्वीप्रमाणे दर रविवारी येथे स्वच्छता करावी, अशी मागणी कॉलनीतील रहिवाश्यांच्या केली आहे.ऋणानुबंध कॉलनीत पहिले तर सर्वत्र झाड पाल्याचा कचरा पडलेला दिसतो. तसेच मुलांनी खाऊ खाऊन टाकलेले प्लस्टिक पडलेले आहे. तर दोन ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे तयार झाले आहेत. त्यामुळे आरोग्यविषयक प्रश्न निर्माण होत आहेत. रोगजंतूची माशा, डास, उंदीर आणि झुरळं यांचे प्रमाण वाढत आहे, त्यामुळे मनपाने हा प्रश्न त्वरित मार्गी लावावा, अशी मागणी केली आहे.

# विद्युत विभागाने वीज पुरवठा सुरळीत करावा

## नागरिकांचे आ. संग्राम जगताप यांच्याकडे मागणी; कल्याण रोड परिसरातील नागरिक त्रस्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** कल्याण रोड परिसरामध्ये गेल्या वर्षभरापासून सातत्याने वीज पुरवठा खंडित होत असून, सुरळीत राहावा, यासाठी नागरिकांनी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



कल्याण रोड परिसर हा झपाट्याने विकसित होत, असल्यामुळे या परिसरामध्ये नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यस आहे. ट्रांसफार्मर ची संख्या कमी असल्यामुळे त्यांना पूर्ण दाबाने वीजपुरवठा होत नसून, तो वारंवार खंडित होत आहे. त्यामुळे घरातील विजेवर चालणारे उपकरणे फ्रिज, फॅन, टीव्ही, वॉशिंग मशीन या वस्तू अक्षरशा जळत आहे. त्यामुळे नागरिकांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागते, एखाद्या दिवशी शॉर्ट सर्किटमुळे एखादी अनुचित घटना घडण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. तरी कल्याण रोड परिसराचा वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे कल्याण रोड परिसरातील सामाजिक कार्यकर्ते अॅड. युवराज शिंदे, कुंडलिक आरवडे, शंकर पाटील, सुधाकर बोली, राजेंद्र जगताप, राजेंद्र पाडळे, विराज टाक, विवेक विधाते यांनी केली.

> अहिल्यानगर शहरामध्ये ट्रांसफार्मरची संख्या कमी असून बसवण्यासाठी विद्युत विभागाकडे पाठपुरावा केला आहे. त्यांनी देखील महापालिकेकडे जागेची मागणी केली असून, लवकरच ट्रांसफार्मर बसविण्याचे काम केले जाणार आहे. विद्युत विभागाचे उपअभियंता यांना फोन करून तातडीने कल्याण रोड परिसरामध्ये जाऊन लाईटचा प्रश्न मार्गी लावून देण्याचे सांगितले.
>
> **– संग्राम जगताप, आमदार**

# नागरी सत्कारातूनच काम करण्यास मिळते ऊर्जा

## माजी महापौर बाबासाहेब वाकळे; नागरिकांच्या वतीने वाकळे यांचा नागरी सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** प्रभागातील नागरिकांनी सातत्याने नगरसेवक पदावर मोठ्या विश्वासाने निवडून दिले, त्या माध्यमातून मी विकासाची कामे मार्गी लावली, या माध्यमातून ऋणानुबंध निर्माण झाले. मी केलेल्या विकास कामाबद्दल शाहूनगर परिसरातील नागरिकांनी माझा नागरिक सत्कार करून अजून जोमाने काम करण्याची प्रेरणा व ऊर्जा दिली. प्रभागामधील नागरिकांनी मागेल त्याला वृक्ष दिला जाईल, असे प्रतिपादन माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी व्यक्त केले.



शाहूनगर परमार्थ निकेतन परिसरातील नागरिकांच्या वतीने मा. महापौर बाबासाहेब वाकळे यांचा नागरी सत्कार संपन्न झाला.

यावेळी उद्योजक चैतन्य जोशी, राजेंद्र चोभे, संतोष साबळे, प्रतिभा काळे, इंजि. वंदना चव्हाण, प्रल्हाद कुलकर्णी, नंदकुमार काळे, इंजि. योगेश चव्हाण, गोपाळ मांडगे, महेश गटणे, सुहास घोडके, सुरेश कदम, हरीश बोळे, सतीश वाकळे, महावीर कासवा, योगेश चौधरी, सुनील साळुंखे, शफी शेख, श्रीपाद ससे, निरंजन जाधव, राजन गीते, बाळासाहेब वाघमारे, प्रकाश देवचक्के आदी उपस्थित होते.

राजेंद्र चोभे म्हणाले की, शाहूनगर परिसरामध्ये नवीन वसाहत वाढत असताना कुठल्याही सुविधा उपलब्ध नव्हत्या, मा महापौर बाबासाहेब वाकळे यांनी ड्रेनेज, लाईट, फेज २ पाणी योजना, रस्ता काँक्रिटीकरणाचे कामे, सोलर लाईट त्यामुळे हा परिसर विकास कामांमुळे अक्षरशा उजाळून निघाला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतिभा काळे यांनी केले. तर आभार संतोष साबळे यांनी मानले.

> परिसरामध्ये कुठल्याही विकासाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळे नागरिकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत होते. मा. महापौर बाबासाहेब वाकळे यांनी यशस्वीपणे विकासाच्या योजना पूर्ण केल्या. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत उल्लेखनीय काम केल्याबद्दल शाहूनगर परिसरातील नागरिकांच्या वतीने त्यांचा नागरिक सत्कार करण्यात आला.
>
> **– नंदकुमार काळे**

# कर्मवीरांच्या शिक्षणातून समता व बंधुताचे संस्कार

## प्राचार्य देवराम वडितके; इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** कर्मवीर भाऊराव पाटील यांचे व्यक्तिमत्त्व जातीभेदाच्या पलीकडे होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार करताना विद्यार्थ्यांमध्ये बंधुता व समता रुजावी यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणातून समता व बंधुता याचे संस्कार विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला असल्याचे प्रतीपादन आश्वी इंग्लिश स्कुल व महाविद्यालयाचे प्राचार्य देवराम वडितके यांनी केले.

आश्वी इंग्लिश स्कुल व महाविद्यालयामध्ये इ. ५ ते १२ पर्यंत नविन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागताप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच शाळीग्राम होडगर होते.



यावेळी विखे कारखान्याचे संचालक विजयराव म्हसे, माजी सरपंच शाळीग्राम होडगर, सितारमा चांडे, भाऊराव कांगुणे, सुभाषराव म्हसे, बाळासाहेब गायकवाड, सुमतीलाल गांधी, ब्रिजमोहन बिहाणी, किशोर जऱ्हाड, प्राचार्य देवराम वडितके यासह विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते.

महाविद्यालयातील १० वी पहिला क्रमांक मिळवणारी साक्षी संदिप हिंगे, दुसरा प्रांजल सोमनाथ थोरात, तिसरा ईश्वरी भिकाजी सांगळे, इयत्ता १२ विज्ञान पहिला क्रमांक मिळवणारी मयुरी विलास म्हसे, दुसरा क्रमांक मिळवणारी पुजा प्रमोद उंबरकर तर तिसरा क्रमांक मिळवणारी जान्हवी पंकज कोळपकर, तसेच १२ कलामध्ये प्रथम क्रमांत मिळवणारी आरती राजु वाघ, दुसरा काजल रघुनाथ बर्डे, तिसरा क्रमांक मिळवणारी बुशरा अन्सार तांबोळी या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिता गाडे यांनी केले.

> पद्मश्री डॉ. विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या संचालकपदी नियुक्ती झाल्याबद्दल ज्या शाळेत शिकलो तिथे माझा सत्कार झाला. याचा आज खरा आंनद आहे. माझे भाग्य आहे, म्हणून मला कमी वयात सहकार क्षेत्रातील अग्रगण्य साखर कारखान्याच्या संचालक पदावर काम करण्याची संधी मिळाली.
>
> **– विजयराव म्हसे,**
> संचालक – विखे कारखाना, प्रवरानगर

# श्री नवनाथ विद्यालयाला स्वच्छ सुंदर शाळा पुरस्कार

## द्वितीय क्रमांकाबरोबरच तीन लाखाचे बक्षीस; प्राचार्य म्हस्के यांची माहिती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील करंजी येथील श्री नवनाथ विद्यालयाला आपली शाळा स्वच्छ शाळा हा तालुका स्तरावरील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. प्रत्येक परीक्षा कॉपीमुक्त होणार असल्याने विद्यार्थ्यांनी देखील त्या दृष्टीने अभ्यासाचे नियोजन करावे, असे आवाहन विद्यालयाचे प्राचार्य संजय म्हस्के यांनी केले आहे.

करंजी येथे सरपंच रफिक शेख यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी पत्रकार विलास मुखेकर, ग्रामपंचायत सदस्य अभय गुगळे, रावसाहेब मुरडे, महेश दुधाने,पर्यवेशक पुजारी यांच्यासह विद्यालयाचे शिक्षक शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य म्हस्के म्हणाले, श्री नवनाथ विद्यालयाची गुणवत्तापूर्व वाटचाल सुरू असून विद्यार्थी शिक्षक आणि पालक यांचा समन्वय राखूनच या विद्यालयाचे शैक्षणिक कार्य सुरू राहणार आहे. सर्व शिक्षक शिक्षिका यांनी देखील आपल्या कर्तव्याचे पालन करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम केले पाहिजे गुणवंत विद्यार्थी हाच खरा त्या शिक्षकाच्या शैक्षणिक कार्याचा आरसा ठरतो. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य म्हस्के यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. श्रीकांत अकोलकर यांनी केले. तर आभार स्वप्निल लवांडे यांनी मानले.

> बारावीचा कला शाखेचा निकाल शिक्षकांच्या दृष्टीने चर्चेचा विषय ठरला आहे. करंजी ग्रामपंचायत व ग्रामस्थांचे नेहमीच विद्यालयाला सहकार्य राहिले आहे. विद्यार्थी असो अथवा शिक्षक गैरवर्तन करणाऱ्यांना कोणीही पाठीशी घालण्याचे काम करू नये विद्यालयात महिला शिक्षकांची संख्या अधिक असल्यामुळे गुणवत्तेच्या बाबतीत त्यांची जबाबदारी प्रामुख्याने महत्त्वाची आहे.
>
> **– रफिक शेख, सरपंच**

## मधुकर जेवरे यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील प्रगतशील शेतकरी मधुकर कृष्णनाथ जेवरे (वय ८३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा स्वभाव मनमिळावू होता. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.



## बिरुबाई बुंदेले यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** श्रीमती बिरुबाई लक्ष्मण बुंदेले (वय ७३, सध्या वास्तव्य निर्मलनगर, अहिल्यानगर) यांचे दीर्घ आजाराने १५ जून रोजी निधन झाले.

# जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

## जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणारी मुलेही उज्वल भविष्य घडवितात : औटी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील नेप्ती येथील जिल्हा परिषद शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाचा पहिला दिवस उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला.

सकाळपासूनच उन्हाळी सुट्टी संपवून शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांनी शाळा गजबली होती. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आल्याची माहिती रामदास फुले यांनी दिली. औटी कुटुंबीयांतर्फे अभिजीत औटी यांच्या पुढाकाराने गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तराचे वाटप करण्यात आले. यासोबतच शासनाच्या समग्र शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश व शूजचेही वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.



तसेच नवोदित विद्यार्थ्यांच्या पावलाचे ठसे घेऊन शाळेचे पहिले पाऊल! उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापिका पद्मा मांडगे यांनी शाळेतील विविध उपक्रमांची माहिती देताना सांगितले की, गेल्या काही वर्षांत शाळेचा शैक्षणिक तसेच भौतिक विकास झाला असून विद्यार्थी संख्या व गुणवत्ता दोन्ही वाढीस लागल्या आहेत. पालक, ग्रामस्थ व शिक्षक यांच्या एकत्रित सहभागातून शाळा गुणवत्तेच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# घुले महाविद्यालयातील बी.एस्सी व एम.एस्सी अभ्यासक्रमांना मान्यता

## माजी आ. डॉ. नरेंद्र घुले, मा. आ. चंद्रशेखर घुले यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, संलग्नित जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राघवेंद्र स्वामी मंदिराजवळ, बोल्हेगाव येथे विज्ञान व तंत्रज्ञान बी.एस्सी (डेटा सायन्स), विज्ञान व तंत्रज्ञान बी.एस्सी (बॉटनी) व विज्ञान व तंत्रज्ञान एम.एस्सी (कम्प्युटर सायन्स) या नवीन अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक मान्यता २०२५, ई-११४३३२९ शैक्षणिक वर्ष-२०२५-२६ पासून नवीन कोर्स अभ्यासक्रम, विषय मान्यता मिळाली असून प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. नवीन अभ्यासक्रमांना मान्यता मिळाल्याबद्दल जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील, सचिव मा. आ. चंद्रशेखर घुले पाटील, विश्वस्त डॉ. क्षितिज घुले पाटील यांनी प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांचे अभिनंदन केले.

बी. एस्सी, कॉम्प्युटर सायन्स, बी.ए., बी.कॉम, बी.एस्सी (केमिस्ट्री) विषयांना पूर्वीपासून मान्यता आहे. या महाविद्यालयाची खास वैशिष्ट्ये म्हणजे अत्याधुनिक भव्य व सुसज्ज इमारत, अद्यावत दोन संगणक कक्ष, गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षण, विद्यार्थ्यांची शिस्त आणि सुरक्षितता याकडे आवर्जून लक्ष दिले जाते.

> सध्याच्या आधुनिक व तंत्रज्ञानाच्या युगात चांगला रोजगार प्राप्तीसाठी हा चांगला कोर्स, अभ्यासक्रम आहे. सदर नवीन अभ्यासक्रमास अहिल्यानगर शहर, एमआयडीसी, औद्योगिक वसाहत व जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या नवीन कोर्सला प्रवेश घ्यावा.
>
> **– डॉ. ए. के. पंदरकर, प्राचार्य**

# गरजवंतांना मदत करणे हीच खरी समाजसेवा : अॅड. वाडेकर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तहानलेल्यांना पाणी देणे, भुकेलेल्यांना अन्नदान करणे ही आपल्या भारतीय संस्कृतीची परंपरा आहे. समाजात अनाथांचे नाथ होणे,गरजूंना मदत करणे, हा मानव धर्म आहे. ज्यांना ज्या गोष्टींची गरज आहे ती पूर्ण केली तर मदत घेणारा आनंदी होतो तर देणारा समाधानी असतो.समाजातील गरजवंतांना मदत करणे हीच खरी समाजसेवा आहे, असे प्रतिपादन मोहटादेवी ट्रस्टचे विश्वस्त अॅड. विक्रम वाडेकर यांनी केले.

सावेडी येथील विनायकराज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विनय वाखुरे यांनी आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करीत समाजासाठी उपक्रम राबविले. या उपक्रमात सर्वसामान्य नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करून तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पातील मुला-मुलींना शालेय साहित्य वाटप केले. याप्रसंगी अॅड. विक्रम वाडेकर, विपुल वाखुरे, विनय वाखुरे, अजय रासकर, अतुल देव्हारे, सिद्धार्थ सारडा, पवण पारिख, राज दळवी आदिंसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी आ. चव्हाणांची वर्णी

## उपमुख्यमंत्री अजित पवार व खा. सुनील तटकरेंनी दिले चव्हाणांना नियुक्ती पत्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आ. सतीश चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. ही नियुक्ती पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी काल (१७ जून) मुंबई येथे केली. यावेळी आ. शिवाजीराव गर्जे, आ. प्रताप



पाटील चिखलीकर, माजी आ. कैलास पाटील, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, मिनल खतगावकर यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

या नियुक्तीनंतर आ. चव्हाण म्हणाले की, नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २६ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. पक्षाने गेल्या २६ वर्षांत निष्ठावान कार्यकर्ते आणि कर्तबगार नेत्यांच्या जोरावर ग्रामीण आणि शहरी भागात आपली मजबूत पकड निर्माण केली आहे.

राष्ट्रवादी हा पक्ष सर्वसामान्यांचा आहे. जात, धर्म, पंथ, पार्श्वभूमी न पाहता इथे प्रामाणिक कार्यकर्त्याला संधी दिली जाते. म्हणूनच त्यांना तीन वेळा पदवीधर मतदारसंघातून आमदार होण्याची आणि आता जिल्हाध्यक्ष पदाची संधी मिळाली, असे त्यांनी सांगितले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खा. सुनील तटकरे यांचे आभार मानले. छत्रपती संभाजीनगर जिल्हा राष्ट्रवादी विचारसरणीशी नेहमीच जोडलेला राहिला आहे. येथील नागरिकांपर्यंत पक्षाचे विचार प्रभावीपणे पोहोचवले जातील, असे चव्हाण यांनी सांगितले. त्यांनी पक्ष संघटनेची नव्याने पुनर्बांधणी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

> गावपातळीपासून तालुका आणि जिल्हास्तरापर्यंत युवक, महिला व इतर आघाड्यांच्या माध्यमातून संघटना कार्यान्वित केली जाईल. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष जिल्ह्यात क्रमांक एकचा पक्ष ठरणार आहे.
>
> – सतीश चव्हाण, आमदार

# करंजीच्या ग्रामसभेत झाली तुफान खडाजंगी

## सत्ताधारी-विरोधक आले आमने-सामने

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुक्यातील करंजी येथे मंगळवारी उत्तरेश्वर मंदिराच्या पाठीमागील सभामंडपात झालेल्या ग्रामसभेप्रसंगी सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात विविध विषयावरून खडाजंगी झाली. त्यामुळे काही वेळ तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली. मात्र उपस्थित पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने आणि वादग्रस्त विषयावर पडदा टाकल्याने वातावरण स्थिरावले.

सरपंच नसीम शेख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेप्रसंगी ग्रामविकास अधिकारी कुमार गणगे यांनी मागील ग्रामसभेचे प्रोसिडिंग वाचन करत विविध शासकीय योजनांची माहिती उपस्थित ग्रामस्थांना दिली. त्यानंतर ग्रामपंचायतच्या वतीने पुढील नियोजित विकास कामांची माहिती सत्ताधारी गटाच्या वतीने शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख रफीक शेख यांनी दिली.

> विरोधकांनी बिन बुडाचे आरोप करू नये, ज्यांनी गुन्हा केला त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. मग आरोपी कोणत्याही जातीचा असो. त्यामुळे विनाकारण विरोधकांनी बिनबुडाचे आरोप करू नयेत, आरोपीला तात्काळ अटक व्हावी म्हणून आरोपीच्या कुटुंबाची चौकशी करण्याची मागणी आम्ही केली. त्यामुळे अशा प्रवृत्तीच्या आरोपीला कोणीही पाठीशी घालण्याचा प्रश्नच नाही.
>
> **रफिक शेख,**
> शिवसेना उपजिल्हाप्रमुख

सत्ताधाऱ्यांनी केलेल्या विकास कामावर बोट ठेवत झालेल्या कामांबाबत विरोधकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करतकाही कामबाबत अक्षेपही नोंदवण्यात आला. जंगलातील बिबट्याचा बंदोबस्त करणे त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अंगणवाडीची जागा बदलने, कृषी व पशुवैद्यकीय विभाग यांच्या वतीने विविध योजनांची माहिती देण्यात आली. रस्ते, वीज पाणी यासह सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या योजनांबाबत देखील या ग्रामसभेत प्रामुख्याने चर्चा झाली. एकंदरीत मंगळवारी झालेल्या ग्रामसभेच्या निमित्ताने सत्ताधारी आणि विरोधक दोन्ही गटाकडून आरोप प्रत्यारोपाच्या अनेक फैरी झडल्या.



या ग्रामसभेप्रसंगी ज्येष्ठनेते सुनील साखरे, माजी सरपंच भाऊसाहेब क्षेत्रे, राजेंद्र क्षेत्रे, सखाराम क्षेत्रे, बाबाजी क्षेत्रे, युवानेते आबासाहेब अकोलकर, माजी चेअरमन आसाराम अकोलकर, रमेश अकोलकर, उत्तम अकोलकर, चेअरमन नंदकुमार अकोलकर, विवेक मोरे, राहुल अकोलकर, नवनाथ आरोळे, प्रशांत अकोलकर, सुनील अकोलकर, अभय गुगळे, गणेश अकोलकर, रघुनाथ अकोलकर, अंबादास नजन, लहानू अकोलकर, दिलीप आहेर, भानुदास अकोलकर, गजानन गायकवाड, सतीश क्षेत्रे, फिलिप क्षेत्रे, रावसाहेब मुरडे, रावसाहेब दुधाने, नितीन खांदवे, महादेव नजन उपस्थित होते.

# पुणे विद्यार्थी गृह संस्थेत ना. विखेंचा वाढदिवस साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : पुणे विद्यार्थी गृह संस्थेच्या नियमक मंडळाचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री व आहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या विविध शाखांमध्ये गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य त्याचप्रमाणे मिष्टान्नाचे वाटप करण्यात आले.

यानिमित्ताने विविध विभागांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, कार्यवाह संजय गुंजाळ, उपकार्याध्यक्ष अमोल जोशी आणि कुलसचिव दिनेश मिसाळ हे पंचवटी शाखेत उपस्थित होते. तर पुणे येथे संस्थेचे संचालक रमेश कुलकर्णी यांच्या हस्ते




विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेमध्ये विविध कार्यक्रम पार पडले. संस्थेच्या कार्यक्षेत्रातील शाळांमधील गरजवंत विद्यार्थ्यांना वह्या व पुस्तकांचे वाटप करण्यात आले. नवीन शालेय वस्तू मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी आपल्या मनोगतातून मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा जीवनपट उलगडवून सांगितला. ना. विखे यांनी संस्थेसाठी केलेल्या कार्याचाही आढावा घेतला. कार्यक्रमास या परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

# होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा हायस्कूल कोल्हार या सीबीएसई शाळेतील विद्यार्थ्यांद्वारे परिसरातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी विद्यालयामध्ये




शाळेचे स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष तथा प्रवरा सहकारी बँकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे यांचे हस्ते परिसरातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे आणि खाऊचे वाटप करण्यात आले. शाळेतील इयत्ता नववी व दहावी मधील विद्यार्थ्यांनी वह्या, पुस्तके, कंपास पेटी, रंग पेटी, बिस्किट पुडे इत्यादी साहित्य स्वखर्चाने संकलित केले आणि हे सर्व साहित्य परिसरातील माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तसेच अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या मुलांना वाटप करण्यासाठी दिले.

> नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालय अनेक वर्षापासून परिसरातील निराधार, अनाथ, अंध, मूकबधिर, गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करीत असते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी राबविलेल्या उपक्रमाचे डॉ. भास्करराव खर्डे यांनी कौतुक केले आणि विद्यार्थ्यांनी चालवलेल्या दातृत्वाच्या भावनेचा उल्लेख करून समाजामधील इतर घटकांनी देखील आपले योगदान द्यावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यालयाचे प्राचार्य सुधीर मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. विद्यालयाचे अकाउंटंट चंद्रकांत डुकरे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त त्यांचा सपत्नीक सत्कार समारंभ प्रमुखातिथींच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रम प्रसंगी पदमश्री विखे पाटील साखर कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खर्डे, मधुकर खर्डे, भगवतीमाता देवालय ट्रस्टचे विश्वस्त संभाजीराव देवकर, अलकाताई डुकरे, भागवत शेळके उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल म्हस्के यांनी केले तर आभार संभाजी आव्हाड यांनी मानले.

# श्रीरामपूरचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील : माजी आ. मुरकुटे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहर व तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांचा शिवसेनेच्या मंत्र्यांकडे पाठपुरावा करुन मार्गी लावण्याचा आगामी काळात प्रयत्न केला जाईल, असे प्रतिपादन माजी आ. भानुदास मुरकुटे यांनी केले.

प्रगतीनगर येथील स्वागत मंगल कार्यालयात आयोजित शिवसेना प्रवेशानंतरच्या मेळाव्यात मुरकुटे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेश गलांडे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून श्रीरामपूर विधानसभा मतदार संघाचे निरीक्षक जनार्दन गालपगारे हे उपस्थित होते. व्यासपीठावर माजी आ. भाऊसाहेब कांबळे, माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे, 'अशोक' चे व्हा. चेअरमन हिम्मतराव धुमाळ, संचालक कोंडीराम उंडे, रावसाहेब थोरात, ज्ञानदेव साळुंके, सोपानराव राऊत, अशोक बँकेचे चेअरमन ॲड्. सुभाष चौधरी, सिद्धार्थ मुरकुटे, भाऊसाहेब उंडे, बाबासाहेब काळे, बाबासाहेब ढोकचौळे, दिगंबर शिंदे, भाऊसाहेब हळनोर, काशिनाथ गोराणे, भगवान उपाध्ये, बापुसाहेब त्रिभूवन, रमेश वारुळे, मंजुश्रीताई मुरकुटे, सुनिताताई गायकवाड, शालिनीताई कोलते आदी मान्यवर उपस्थित होते.

मुरकुटे म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असतांना केलेल्या उल्लेखनिय व दैदिप्यमान कामाची जाण ठेवून तसेच आपणा सर्वांच्या आग्रहास्तव आपण शिवसेना पक्षात प्रवेश केलेला आहे. पक्ष प्रवेशामुळे श्रीरामपूर विधानसभा मतदार संघातील शहरी व ग्रामीण



> गालपगारे म्हणाले की, माजी आ.भानुदास मुरकुटे यांच्या शिवसेना प्रवेशाने जिल्ह्यातील शिवसेना संघटनेला बळकटी मिळणार आहे. त्यांच्यासारखा धाडसी नेता शिवसेनेत आल्याने निश्चितच पक्षाची ताकद जिल्ह्यात वाढणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली मतदार संघाचे नव्हे तर जिल्ह्याचे प्रश्न उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून मार्गी लावले जातील.

भागातील विविध विकास कामे ही आपल्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांचे मंत्रीमंडळातील अन्य सहकारी, शिवसेनेचे पदाधिकारी यांचे माध्यमातून करावयाची आहे. भविष्यात वेगवेगळ्या शासकीय कमिट्यांमध्ये शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना प्रतिनिधीत्व मिळेल यादृष्टीने प्रयत्न केले जातील. यावेळी माजी आ. भाऊसाहेब कांबळे, अशोक कारखान्याचे संचालक निरज मुरकुटे, माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे, राजेंद्र देवकर आदींनी आपले मनोगते व्यक्त केली.

# शेतजमिनी, वस्ती आणि शाळेचा रस्ता बंद

## 'हवाई सेवा द्या, अन्यथा आत्मदहन'चा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : कळस पिंपरी गावठाण ते बुळे वस्ती मार्ग बंद असल्याने शेतकरी आणि ग्राम स्थांचे प्रचंड हाल सुरू आहेत. या मार्गावरील शेतजमिनी ऐन पेरणीच्या काळात पडीक राहत असून, मुलांना शाळेत जाणेही अवघड झाले आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामस्थांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार मोनिका राजळे यांच्यासह तहसीलदार यांच्याकडे निवेदन दिले आहे.

संबंधित शेतजमिनी आणि रस्त्याची पाहणी करण्यासाठी शासनाने हेलिकॉप्टर किंवा विमान सेवा सुरू करावी, अन्यथा आठ दिवसांत सकारात्मक



निर्णय न झाल्यास संपूर्ण गावकरी तहसील कार्यालया समोर सामूहिक आत्मदहन करतील, असा इशारा या निवेदनात दिला आहे. गावातील प्रभावशाली व्यक्तींकडून शासकीय रस्ता अडवून ठेवण्यात आला असून, त्यांच्या दहशतीमुळे ५०-६० घरे मागील वर्षभर विजेअभावी अंधारात आहेत. लाईट पोल दुरुस्तीला प्रतिबंध, शेतात येऊ नये यासाठी धमक्या, तलवार-कुऱ्हाडीने वाट अडवणे, या सर्व घटनांचे व्हिडीओ पुरावे ग्रामस्थांकडे असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

या निवेदनाचे नेतृत्व भाजपचे तालुकाध्यक्ष दिगंबर भवार यांनी केले असून कळस पिंपरी सरपंच बळीराम मिसाळ, उपसरपंच मोनिका पवार, हिरामण गाडे, मिराबाई शेळके, अनिल पवार, भाऊसाहेब भवार, अमीन शेख, सिताराम शेळके, सोमनाथ बुळे आदी ग्रामस्थांनी एकमुखीपणे हा आवाज उठवला आहे.

# सौरपंपाचे वादळामुळे मोठे नुकसान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : नगर तालुक्यातील मेहेकरी येथील अशोक रंगनाथ पवार यांच्या सौरपंपाचे वादळी वाऱ्यामुळे मोठे नुकसान झाले असून सौर पंपाचा संपूर्ण संच उखडून इतरत्र पडल्याने पवार यांचे सुमारे अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.सहा महिन्यापूर्वीच हा सौरपंप पवार यांच्या विहिरीजवळ बसवण्यात आला होता. परंतु दोन दिवसापूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे हा पंप उलथुन पडल्याने पवार यांचे मोठे नुकसान झाले असून संबंधित कंपनीने घटनास्थळी भेट देऊन तात्काळ नवीन पंप देण्याची व्यवस्था करावी अथवा आर्थिक मदत करावी अशी मागणी शेतकरी अशोक पवार यांनी केली आहे.

मेहेकरी परिसरात दोन दिवसापूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांची झाडं पडली विजेचे पोल पडले तारा तुटल्या इतरही अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान या वादळी वाऱ्यामध्ये झालेले आहे.

# जनावरांचे अवैध कत्तलखाने बंद करा

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर जिल्ह्यात सुरु असलेले गोवंशीय जनावरांचे अवैध कत्तलखाने बंद करून बंद करावेत तसेच सर्व मशिदींवरील भोंगे तात्काळ काढून टाकावेत. यासाठी आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु करण्यात आले. उपोषणात कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट, मढीचे सरपंच संजय मरकड, कालिदास महाराज घोडके, सुंदरनाथ महाराज, कानिफनाथ आखाडा, सुथबीरनाथ महाराज, सुखवीरनाथ महाराज, सोपाननाथ महाराज, सोमनाथ महाराज, मच्छिंद्र वेताळ, रमेश मरकड हे उपोषणाला बसले आहेत.

सरपंच मरकड म्हणाले की, आपण ७ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देवून जिल्ह्यात सुरु असलेले गोवंशीय जनावरांचे अवैध कत्तलखाने



बंद करून उध्वस्त करावेत तसेच सर्व मशिदींवरील भोंगे तात्काळ काढून टाकावेत, अशी मागणी केली होती. त्यावेळी ही आंदोलनाचा इशारा दिला होता परंतु प्रशासनाने १० दिवसांत कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर १६ मे व २ जून रोजी पुन्हा स्मरणपत्रे दिली. परंतु त्यावर आज रोजी पर्यंत कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.

# के. जी. कुलकर्णी यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**लोणी** : राहाता तालुक्यातील लोणी येथील के. जी. कुलकर्णी (वय ८५) यांचे वृद्धप काळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कुलकर्णी हे जुन्या पिढीतील असल्याने त्यांचा या परिसरात दांडगा परिचय होता. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

# भूमीअभिलेख कार्यालयात ठिय्या आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : मौजे शिराढोण तालुका नगर येथील शेतकरी विश्वास भाऊसाहेब फुलारी यांनी आपल्या शेतजमिनीची अति तातडी शासकीय मोजणी होण्यासाठी २० एप्रिल २०२३ रोजी फी भरून अर्ज केला होता. अद्यापही भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी व अधिकाऱ्यांनी मोजणी केलेली नसल्याच्या निषेधार्थ जन आधार सामाजिक संघटनेच्या वतीने भूमी अभिलेख कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले.

यावेळी जन आधार सामाजिक संघटनेचे अध्यक्ष प्रकाश पोटे, विश्वास फुलारी, अशोक बनसोडे, सुरेश कसाब आदी पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात पुढे म्हटले आहे की, अति तातडी शासकीय मोजणी फी भरून दोन वर्ष होऊन देखील मोजणी अद्यापही झालेली नाही. तसेच विचारणा केली असता उडवा उडवीची उत्तरे दिल्याने उपाधीक्षक भूमी अभिलेख नगर तालुका यांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

# निसर्गाचा हिरवा ठेवा प्रत्येकाने जपावा

## डॉ. सुप्रिया ढोकणे; ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे. 'जगा आणि जगू द्या' हे तत्व निसर्गाच्या दृष्टीने महत्वपुर्ण आहे. बदलत्या हवामानाचा सामना करण्यासाठी आणि पर्यावरण शुद्ध ठेवण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. यासाठीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वृक्ष संवर्धनाच्या चळवळीला पुढे घेवून जाण्यासाठी 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम राबविण्याच्या केलेल्या आवाहानाला पाठबळ म्हणून मंत्री विखे पाटील यांनी आपला वाढदिवस हा प्रवरा संकुलासह सर्व गावे, वाड्या वस्त्यांमध्ये वृक्ष संवर्धन आणि वृक्षारोपण उपक्रम राबविण्याचे सुचित केले होते. 'वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन' हा निसर्गाचा हिरवा ठेवा आहे आणि तो प्रत्येकाने जपण्याचे काम करावे, असे प्रतिपादन पायरेन्सच्या विश्वस्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील यांनी केले.

डॉ. ढोकणे पाटील म्हणल्या, 'ग्रीन लिगसी डे' अर्थात वृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती मोहिमेने झाली पर्यावरण रक्षण ही काळाची गरज, वृक्षारोपण हा भविष्यासाठी दिला जाणारा हिरवा ठेवा आहे. पर्यावरण संतुलन बिघडल्यामुळे अनेक समस्या ह्या वाढल्या आहेत. शेती निसर्ग त्याचबरोबर मनुष्यावर ही परिणाम



जाणवत आहे. यासाठी पर्यावरण जनजागृती ही सर्वाची जबाबदारी आहे. त्यांच्या उपस्थितीत परिसरात विविध प्रजातींच्या सुमारे १०० हून अधिक औषधी वनस्पती लागवड करण्यात आली.

कार्यक्रमांचे आयोजन संस्थेचे सचिव व संचालक डॉ. निलेश बनकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. सप्ताहभर दररोज एक विशेष सामाजिक उपक्रम राबविला जाणार असून त्यात कॅम्पस स्वच्छता मोहिम, आरोग्य तपासणी शिबिरे, साहित्य दान, योग दिन अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे, अशी माहिती पायरेन्स आयबीएमएचे संचालक डॉ. मोहसीन तांबोळी यांनी दिली.

### 'वाढदिवस सप्ताह'चे आयोजन

पायरेन्सचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त 'वाढदिवस सप्ताह' साजरा होत आहे. या कालावधीत समाजकल्याण, पर्यावरण, आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या उपक्रमाचा प्रारंभ डॉ. सुप्रिया ढोकणे विखे पाटील यांनी केला.

# संपादकीय

## आर्थिक चिंता वाढणार...

देशात गेल्या काही वर्षांमध्ये बचतीच्या प्रमाणात घट होत आहे. मुदत ठेवींचे व्याजदर कमी झाल्याने अनेकांनी गुंतवणुकीसाठी वेगळे मार्ग चोखाळले आहेत. त्यात 'एसआयपी'चा वाटा मोठा आहे. लोक व्याजदर कमी असणाऱ्या बँकांकडून कर्ज घेतात तर जादा परतावा देणाऱ्या बँकांमध्ये पैसे गुंतवतात. परिणामी, बँकांचे रोख गुणवत्ता प्रमाण घसरले आहे. फारसा निधी राहिलेला नाही. बँकांना हजारो कोटी रुपयांच्या ठेवींची गरज असताना ठेवींचे प्रमाण घटले आहे. ठेवी आणि कर्जाच्या प्रमाणात तफावत पडत चालल्याने बँका अडचणीत येऊ शकतात. बँकांमध्ये मुदत ठेव ठेवणाऱ्यांमध्ये मुख्यतः ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असतो. आता रिझर्व्ह बँकेने रेपो दरामध्ये ०.५० बेसिक पॉईंटने कपात केल्यानंतर कर्जावरचे व्याजदर कमी केले आहेत. त्याच प्रमाणात साधारण अर्धा टक्क्यांनी ठेवीवरचा व्याजदरही कमी होऊ शकतो. हा व्याजदर सहा टक्क्यांच्या आसपास येणार असल्याने ज्येष्ठांच्या उत्पन्नात कपात होईल. परिणामी, मुदत ठेवीतील गुंतवणूक आणखी कमी होऊन बँकांना शॉर्ट मार्जिनचा फटका बसू शकतो. अशा वेळी गुंतवणुकीचे अन्य पर्याय शोधण्याबरोबरच मुदत ठेवींमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक करण्याचे टाळले पाहिजे. आता कमी मुदतीच्या मुदत ठेवींचा विचार करणे हा एक शहाणपणाचा निर्णय असू शकतो. रेपोदरात वाढ होऊन, मुदत ठेवीवरचे व्याज वाढल्यास त्यात दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार करता येईल. कोरोनाच्या काळात विकासाला चालना देणे आणि तत्कालीन आर्थिक परिस्थितीला मदत करणे हे उद्दिष्ट असल्यामुळे कमी रेपो दराचा निर्णय घेण्यात आला होता. कमी रेपो दरामुळे अर्थव्यवस्थेत तरलता सहजतेने प्रवाहित होऊ शकली. आता महागाई नियंत्रणात आहे. बाजारात उलाढाल कमी होत आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने रेपोदर कमी करून बाजारात चलन फिरवण्याचा निर्णय घेतला आहे. वित्तीय संस्था सामान्यतः ठेवींचे दर निश्चित करण्यासाठी आरबीआयच्या रेपो दराचा वापर करतात. ऐतिहासिकदृष्ट्या, पॉलिसी दर कपातीमुळे बँकांनी सर्व कालावधीसाठी ठेवींचे दर कमी केले आहेत. काही बँका आणि बिगरबँकिंग वित्तीय कंपन्यांनी (एनबीएफसी) अलीकडेच ४००-४५० दिवसांच्या कालावधीसाठी विशेष उच्च-व्याज ठेव योजना सुरू केल्या आहेत. तथापि, वित्तीय संस्थांनी सूचित केले आहे की या तिमाहीमध्ये त्यांच्या ठेवींचे दर समायोजित करण्यास विलंब होऊ शकतो. कारण त्यांना कर्जवाढ करण्यासाठी ठेवींची आवश्यकता आहे. ठेवींच्या दरांमध्ये घट झाल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या निष्क्रिय उत्पन्नात घट होऊ शकते. ते प्रामुख्याने मुदत ठेवीवरील कर्जाच्या उत्पन्नावर अवलंबून असतात. त्यामुळे, निवृत्त व्यक्तींना त्यांच्या निश्चित मासिक उत्पन्नाला पूरक म्हणून मुदत ठेवीच्या व्याजापलीकडे जाऊन पर्यायांचा शोध घ्यावा लागेल. रिझर्व्ह बँकेने रेपोददरांमध्ये कपात केली आहे. हे आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी अनुकूल धोरणाकडे वळण्याचे संकेत देते.

या वातावरणात व्याजदरांमध्ये घसरण होऊ शकते, हे लक्षात घेऊन मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना आपल्या पोर्टफोलिओचा आढावा घ्यावा लागेल आणि योग्य परतावा मिळवण्यासाठी योग्य धोरणे विचारात घ्यावी लागतील. येत्या काही महिन्यांमध्ये मुदत ठेवींचे दर कमी होण्याची अपेक्षा आहे. सामान्यतः बँका आणि बिगर बँकिंग संस्था अल्पकालीन ठेवींवर व्याजदर कमी करतात आणि दीर्घ मुदतीच्या (५-१० वर्षे) मुदत ठेवीवर जास्त व्याजदर ठेवतात. म्हणजेच पैसे लवकर परत हवे असणाऱ्यांना उत्पन्न वाढवण्यासाठी त्वरीत पावले उचलावी लागतील. दर कमी होण्यापूर्वी एक-दोन वर्षांच्या एफडीमध्ये अतिरिक्त निधी गुंतवण्याचा विचार करावा लागेल. पर्यायी स्थिर उत्पन्न गुंतवणूक पर्यायांचाही विचार करावा लागेल. मुदत ठेवीचे व्याजदर कमी होतात, तेव्हा गुंतवणूकदार स्थिर उत्पन्नाच्या पर्यायांमध्ये विविधता आणू शकतात. एक पर्याय म्हणजे बिगर बँकिंग संस्थांकडून उच्च दर्जाच्या कॉर्पोरेट एफडीमध्ये गुंतवणूक. किमान गुंतवणूक रक्कम जास्त असली, तरी कॉर्पोरेट क्षेत्रातील एक-दोन वर्षांच्या एफडी तुलनात्मक कालावधीच्या बँक एफडींपेक्षा ५० बेसिस पॉइंट्स जास्त दर देतात. लहान कालावधीच्या एफडी परिपक्व होतात, तसतसे गुंतवणूकदार नवीन प्रचलित दरांवर पुन्हा गुंतवणूक करू शकतात. रिझर्व्ह बँकेच्या निर्णयामुळे अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल तर रिअल इस्टेट बाजारात अपेक्षा वाढल्या आहेत. रिअल इस्टेट तज्ज्ञांच्या मते रिझर्व्ह बँकेचा रेपोदर कपतीचा निर्णय रिअल इस्टेट क्षेत्रासाठी एक नवीन बूस्टर डोस ठरू शकतो. यामुळे घर खरेदीदारांचा आत्मविश्वास वाढेल.

रेपो दरात अलिकडे झालेली ५० बीपीएस कपात रिअल इस्टेट क्षेत्रासाठी चांगली ठरणार आहे. याचे कारण असे की रिझर्व्ह बँकेने घरगुती खासगी वापराला प्रोत्साहन देण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. यामुळे ईएमआय कमी होईल आणि नवीन घर खरेदीदारांसाठी चांगल्या दराने गृहकर्ज उपलब्ध होतील. खरेदीदारांसाठी हा मोठा दिलासा असेल. कारण मालमत्तेच्या किमती सतत वाढत असल्यामुळे रिझर्व्ह बँकेने व्याजदरात कपात केल्याने घर खरेदी करणाऱ्यांना दिलासा मिळू शकतो. विशेषतः मध्यम उत्पन्न गटातील आणि पहिल्यांदाच घर खरेदी करणाऱ्यांमध्ये मागणी वाढण्याची अपेक्षा आहे. रिझर्व्ह बँकेने रेपो दर कमी करून देशातील सामान्य लोकांना अलिकडे मोठा दिलासा दिला. या कपातीनंतर रेपो रेट सहा टक्क्यांवरून ५.५ टक्क्यांवर आला. वर्षभरातील ही तिसरी कपात आहे. २०२५ मध्ये रेपो रेटमध्ये कपात करण्याची ही तिसरी वेळ आहे. देशातील महागाई कमी करण्याबाबत आणि आर्थिक विकासाला पाठिंबा देण्यासाठी अधिक उदारमतवादी चलनविषयक धोरण स्वीकारण्याबाबत रिझर्व्ह बँकेचा वाढता विश्वास यातून दिसून येतो. रेपो दर कमी करण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कर्ज देण्याचा खर्च आणखी कमी होईल. म्हणजेच बँका आता गृहकर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक कर्ज, किरकोळ कर्जांवरील व्याजदर कमी करतील. नवीन कर्ज घेण्याचा विचार करणाऱ्याला ते कमी व्याजदराने मिळेल. म्हणजेच शैक्षणिक कर्ज किंवा कार कर्ज आता पूर्वीपेक्षा स्वस्त मिळेल. रेपो दरात कपात झाल्यामुळे लघु आणि मध्यम उद्योग आणि व्यवसाय कर्जांवरील व्याजदरदेखील कमी होईल. परिणामी, व्यवसाय चालवणे सोपे होईल. यामुळे अधिकाधिक लोकांना रोजगार मिळेल आणि आर्थिक व्यवहार वाढतील.

# विकासाची स्थिती, व्याजकपातीची भीती

**अर्थनगरीतून**

**– महेश देशपांडे, आर्थिक घडामोडींचे जाणकार**

सरत्या आठवड्यामध्ये बरकतीच्या बातम्या समोर आल्या. अर्थात मुदत ठेवीवर कमी व्याज मिळणार असल्याने नाराजीची लकेरही पहायला मिळाली. सर्वप्रथम संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये तेजी पहायला मिळाली. दरम्यान, सोन्यापेक्षा सुवर्ण कंपन्या जास्त फायद्यात असल्याचे निरिक्षण समोर आले. त्याच वेळी भारतात १७ कोटी लोक दारिद्र्यरेषेबाहेर आल्याचा दावा पहायला मिळाला. त्याबद्दल मतम तांतरेही समोर आली.

अर्थनगरीमध्ये सरत्या आठवड्यामध्ये बरकतीच्या बातम्या पहायला मिळाल्या. अर्थात मुदत ठेवीवर कमी व्याज मिळणार असल्याने नाराजीची लकेरही पहायला मिळाली. सर्वप्रथम संरक्षण क्षेत्रातील कंपन्यांच्या शेअर्समध्ये तेजी पहायला मिळाली. दरम्यान, सोन्यापेक्षा सुवर्ण कंपन्या जास्त फायद्यात असल्याचे निरिक्षण समोर आले. महत्वाची बाब म्हणजे भारतात १७ कोटी लोक दारिद्र्यरेषेबाहेर आल्याचा दावा पहायला मिळाला. त्याबद्दल मतांतरेही समोर आली.

निफ्टी इंडिया डिफेन्स क्षेत्रातील कंपन्यांनी यंदा चांगली कामगिरी केली आहे. गेल्या पाच महिन्यांमध्ये या क्षेत्रातील शेअर्समध्ये जवळपास ४० टक्क्यांची तेजी आली आहे. निफ्टी ५० मध्ये केवळ पाच टक्क्यांची तेजी दिसून आली. एका रिपोर्टनुसार निफ्टी डिफेन्स निर्देशांकातील सात संरक्षण क्षेत्रातील स्टॉकच्या किंमतीमध्ये अलिकडच्या काळात ५० ते १०० टक्के तेजी पहायला मिळाली आहे. 'गार्डन रीच शिपबिल्डर्स अँड इंजिनिअर्स'च्या शेअरमध्ये या वर्षी १११ टक्क्यांपर्यंत तेजी पहायला मिळाली. या कंपनीचा स्टॉक १६१६ रुपयांवरून ३४०६ रुपयांवर पोहोचला. ६ जूनला या स्टॉकमध्ये ४.६९ टक्क्यांची घसरण झाली. सध्या हा शेअर ३२४६.९० रुपयांवर आहे; मात्र एका महिन्यात या कंपनीचा स्टॉक ७७.२० टक्क्यांनी वाढला आहे. 'भारत डायनॅमिक्स कंपनी'च्या स्टॉकमध्ये या वर्षात ७५ टक्क्यांची तेजी पहायला मिळाली आहे. ११२३ रुपयांवरून स्टॉक १९६९ रुपयांवर पोहोचला आहे. दारुगोळा आणि मिसाईल सिस्टीम बनवणाऱ्या डिफेन्स क्षेत्रातील सरकारी कंपनीने गेल्या पाच वर्षांमध्ये १६१३ टक्के रिटर्न दिला आहे.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर'च्या शेअरमध्ये ३८ टक्के तेजी आली आहे. 'सोलर इंडस्ट्रीज इंडिया'च्या शेअरमध्येही जोरदार तेजी आली आहे. हा शेअर ७४ टक्क्यांनी वाढला असून या वर्षात ९७८३ वरुन १७०२३ रुपयांवर पोहोचला होता. सध्या हा शेअर १६५२३ वर आहे. एस्ट्रा मायक्रोवेव प्रोडक्टसच्या शेअरमध्ये २०२५ मध्ये ५४ टक्के तेजी आली आहे. ७६८ रुपयांवरून हा स्टॉक ११७९ रुपयांवर पोहोचला आहे. ६ जूनला कंपनीचा शेअर ४.१२ टक्क्यांनी घसरून ११३० रुपयांवर आला आहे. कोचीन शिपयार्डच्या शेअरमध्येदेखील ५३ टक्के तेजी पहायला मिळाली आहे. हा स्टॉक १५३९ रुपयांवरून २३५१ रुपयांवर पोहोचला आहे. ही संरक्षण क्षेत्रातील मोठी कंपनी आहे. जानेवारी २०२५ पासून या स्टॉकमध्ये ७१ टक्क्यांची तेजी पहायला मिळाली आहे. १००८ वरून हा स्टॉक १७२५ रुपयांवर पोहोचला आहे. माझगाव डॉक शिपबिल्डर्सच्या शेअरमध्ये ५४ टक्क्यांची तेजी आली आहे. २२२८ रुपयांवरुन हा स्टॉक ३४३० रुपयांवर पोहोचला होता.

दरम्यान, सोने कर्ज देणाऱ्या मुथूट फायनान्स, मणप्पुरम फायनान्स आणि आयआयएफएल फायनान्स या कंपन्यांचे शेअर्स आठ टक्क्यांपर्यंत वाढले. याचे कारण रिझर्व्ह बँकेची (आरबीआय) घोषणा. त्यात सोन्यावर घेतलेल्या कर्जाचे मूल्य वाढवण्याचे सूतोवाच करण्यात आले होते. आता २.५ लाख रुपयांपर्यंतच्या सोने कर्जावरील कर्ज ते मूल्य (एलटीव्ही) गुणोत्तर ७५ टक्क्यांवरून ८५ टक्क्यांपर्यंत वाढवले जाईल, असे रिझर्व्ह बँकेने जाहीर केले आहे. एक लाख रुपयांचे सोने असेल, तर आता त्यावर ८५ हजार रुपयांचे कर्ज मिळू शकते. पूर्वी ही मर्यादा ७५ हजार रुपये होती. नवीन सुवर्ण कर्ज नियमावली दोन दिवसांपूर्वी जाहीर करण्यात आली. हा निर्णय केवळ कर्जदारांसाठी फायदेशीर नाही, तर सुवर्ण कर्जक्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांसाठीही एक मोठा सकारात्मक संकेत आहे. रिझर्व्ह बँकेने एप्रिल २०२५ मध्ये एक मसुदा नियामक चौकट जारी केली होती. त्यात सुवर्ण कर्जांशी संबंधित मार्गदर्शक तत्त्वे प्रस्तावित केली होती. त्याचा उद्देश सर्व प्रकारच्या कर्जदात्यांसाठी, जसे की बँका, एनबीएफसी, गृहनिर्माण वित्त कंपन्या, सहकारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांसाठी एकसमान नियम निश्चित करणे हा होता. नव्या नियमांनुसार सर्व कर्जदात्यांना त्यांच्या क्रेडिट आणि जोखीम धोरणांमध्ये सुवर्णकर्जाशी संबंधित नियम समाविष्ट करावे लागतील. सोन्याचे मूल्य आणि शुद्धता तपासण्यासाठी मानक प्रक्रिया लागू कराव्या लागतील. कर्जाचे पैसे कशासाठी वापरले जात आहेत, यावर लक्ष ठेवणे आवश्यक असेल. याखेरीज मागील कर्ज मानक श्रेणीत असेल आणि एलटीव्ही गुणोत्तरात येत असेल, तरच कर्जाचे नूतनीकरण आणि टॉप-अप उपलब्ध असेल. तसेच कर्ज देण्यापूर्वी कर्जदाराच्या परतफेड क्षमतेचे योग्य मूल्यांकन आणि योग्य परिश्रम करणे अनिवार्य असेल. रिझर्व्ह बँकेचा हा निर्णय सुवर्ण वित्त कंपन्यांच्या व्यवसायाला चालना देऊ शकतो. यातून अधिक ग्राहक कर्जासाठी पुढे येऊन कंपन्यांचा व्यवसाय वाढेल.

याच सुमारास एक लक्षवेधी अर्थवृत्त देशात चर्चेचा विषय ठरले. भारताचा दारिद्र्यरेषेचा दर एका दशकात झपाट्याने घसरून ५.३ टक्क्यांवर आला. तो २०११-१२ मध्ये २७.१ टक्के होता. ही टिप्पणी जागतिक बँकेने केली आहे. जागतिक संस्थेने दारिद्र्यरेषेची व्याप्ती वाढवून तीन अमेरिकन डॉलर प्रतिदिन केली आहे. जागतिक बँकेने असाही दावा केला आहे की २०११-१२ ते २०२२-२३ या दशकात भारताने १७.१ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेखालून बाहेर काढले आहे. जागतिक बँकेने एका अहवालात म्हटले आहे की २०१७ ते २०२१ दरम्यानच्या भारतातील महागाई दराचा विचार करता सुधारित दारिद्र्यरेषेचा तीन अमेरिकन डॉलरचा आधार घेतल्यास भारतातील गरिबीचा दर ५.३ टक्के होता. अहवालात म्हटले आहे की २०२४ मध्ये भारतात ५४,६९५,८३२ लोक दिवसाला तीन डॉलरपेक्षा कमी उत्पन्नावर जगत होते. भारतातील अतिगरिबी १६.२ टक्क्यांवरून २.३ टक्क्यांपर्यंत घसरली. या काळात कमी तसेच मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये दारिद्र्याचा दर ३३.७ टक्क्यांनी कमी झाला. जागतिक बँकेने मान्य केले आहे की मोफत आणि अनुदानित अन्न वितरणामुळे गरिबी कमी झाली असून ग्रामीण आणि शहरी गरिबीमधील दरी कमी झाली आहे. अहवालानुसार ५४ टक्के अत्यंत गरीब लोक सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या पाच राज्यांमध्ये राहतात. भारताचा वास्तविक जीडीपी कोरोनापूर्वीच्या पातळीपेक्षा पाच टक्के कमी आहे. जागतिक बँकेनुसार सध्याच्या जागतिक अनिश्चिततेचे निराकरण पद्धतशीरपणे केले गेल्यास २०२७-२८ पर्यंत भारताचा विकास त्याच्या क्षमतेपर्यंत पोहोचेल. तथापि, भारतीय आर्थिक परिस्थितीमध्ये लक्षणीय घसरणीचे धोके आहेत. जागतिक स्तरावर सतत होत असलेल्या धोरणात्मक बदलांमुळे हे घडत आहे. वाढत्या जागतिक तणावामुळे भारताच्या निर्यातीची मागणी कमी होईल आणि गुंतवणुकीत पुनर्प्राप्ती होण्यास आणखी विलंब होईल.

आर्थिक वर्ष २०२६-२८ मध्ये चालू खात्यातील तूट अहवालानुसार सरासरी जीडीपीच्या १.२ टक्के राहण्याची अपेक्षा आहे. अहवालानुसार भारताचा परकीय चलन साठा जीडीपीच्या सुमारे १६ टक्के स्थिर राहण्याची अपेक्षा आहे. एप्रिलमध्ये भारताविषयीच्या 'गरिबी आणि समता संक्षिप्त अहवाला'मध्ये जागतिक बँकेने म्हटले आहे की गेल्या दशकात भारताने गरिबीमध्ये लक्षणीय घट केली आहे. अतिगरिबी (दररोज २.१५ अमेरिकन डॉलर्सपेक्षा कमी उत्पन्नावर जगणारी) २०११-१२ मध्ये १६.२ टक्क्यांवर होती. २०२२-२३ मध्ये ती २.३ टक्क्यांपर्यंत घटली आहे. यामुळे सुमारे १७ कोटी १० लाख लोकांना अतिगरिबीतून बाहेर काढण्यात आले आहे. ग्रामीण भागातील अतिगरिबी १८.४ टक्क्यांवरून २.८ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. शहरी भागात ती १०.७ टक्क्यांवरून १.१ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. त्यामुळे ग्रामीण-शहरी अंतर ७.७ टक्क्यांवरून १.७ टक्क्यांपर्यंत कमी झाले आहे.

आता एक महत्वाची बातमी. रिझर्व्ह बँकेने अलीकडेच रेपो दरात ०.५० टक्के कपात केल्याचा परिणाम कर्जदारांसाठी फायदेशीर असला, तरी मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांसाठी हानिकारक ठरू शकतो. रेपो दरात कपात झाल्यामुळे कर्जाचे व्याजदर कमी होत असले, तरी बँकांच्या ठेवींच्या दरांवरही त्याचा थेट परिणाम होतो. यामुळे मुदत ठेवींवरील परतावा कमी होऊ शकतो. बचतीवर निश्चित व्याजदर हवा असणाऱ्यांना आता कमी परतावा मिळण्याची शक्यता जास्त आहे. अशा परिस्थितीत गुंतवणूकदारांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे आणि मुदत ठेव करण्यापूर्वी चांगले पर्याय माहिती करून घेणे आवश्यक आहे. हा निर्णय विशेषतः गृहकर्ज, वाहन कर्ज किंवा वैयक्तिक कर्ज घेतलेल्यांसाठी किंवा घेण्याचा विचार करत असलेल्यांसाठी फायदेशीर आहे. रेपो दरात कपात झाल्यामुळे बँका आता स्वस्त दरात कर्ज देऊ शकतात. त्यामुळे 'ईएमआय'मध्येही दिलासा मिळेल. रेपो दरात कपातीचा एक परिणाम मुदत ठेवी (एफडी) गुंतवणूकदारांवर होईल. गेल्या काही महिन्यांमध्ये रेपो दर कमी झाल्यामुळे बँकांनी मुदत ठेवीवरील व्याजदरही कमी केले आहेत. स्टेट बँक रिसर्चनुसार, फेब्रुवारी २०२५ पासून मुदत ठेवीवरचे दर ३० ते ७० बेसिस पॉइंट्सने कमी झाले आहेत. केवळ मुदत ठेवीच नाही, तर बचत खात्यांवरही व्याजदर कमी होत आहेत. मुदत ठेवीत गुंतवणूक करायची असेल तर अजूनही संधी आहे. अनेक बँका दीर्घकालीन एफडीवर आठ टक्के किंवा त्याहून अधिक व्याज देत आहेत. तथापि, जास्त व्याज देणाऱ्या बहुतेक बँका लघु वित्त बँका आहेत, ज्यामध्ये काही धोकादेखील असतो. अशा परिस्थितीत गुंतवणूक करण्यापूर्वी डीआयसीजीसी विमा कव्हरअंतर्गत येते याची खात्री करावी. त्यात पाच लाखांपर्यंतच्या ठेवींचा समावेश आहे.

# श्रीरामपुरात उद्या दिंडीचे होणार आगमन

## माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिकांसह आ. ओगले दिंडीच्या स्वागतासाठी सज्ज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्रंबकेश्वर येथील संत श्रेष्ठ निवृत्ती महाराज संस्थांनच्या वतीने आषाढी एकादशीस पंढरपुरला जाणाऱ्या निवृत्तीनाथांच्या पालखी व दिंडीचे श्रीरामपूर नगरीमध्ये उद्या, दि. १९ जून रोजी दुपारी १२.३० वाजता आगमण होणार आहे.

श्रीरामपूर-संगमनेर रस्त्यावरील जुन्या जकात नाक्याजवळ मान्यवरांचे उपस्थितीत पालखीचे स्वागत करण्यांत येणार आहे. संत निवृत्तीनाथ महाराज पालखी व दिंडीचे नेतृत्व, पालखीचे मानकरी जयंत महाराज गोसावी, बाळकृष्ण महाराज डावरे, मोहन महाराज बेलापुरकर, बाळासाहेब देहुकर, महामंडलेश्वर, राम कृष्ण महाराज लहवीतकर, सुरेश महाराज गोसावी, अध्यक्ष त्र्यंबकराव गायकवाड व मंदिराचे विश्वस्त करीत आहेत.

पालखीच्या स्वागतासाठी खा. भाऊसाहेब वाकचौरे, आ. हेमंत ओगले, माजी आ. भाऊसाहेब कांबळे, माजी आ. भानुदास मुरकुटे, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, युवा नेते सिध्दार्थ मुरकुटे, संजय फंड, प्रातांधिकारी किरण पाटील, तहसिलदार मिलिंद वाघ, अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलबुर्मे, सभापती सुधीर नवले, सचिन गुजर आदी उपस्थित राहणार आहेत. पालखीचे स्वागतासाठी भाविकांनी, वारकऱ्यांनी, नागरिकांनी, भजनीमंडळ व महिला भजनी मंडळ आदींनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.




### वारकऱ्यांना भंडारा देणार

पालखीची शोभायात्रा संगमनेर रोड, गांधीपुतळा चौक मेनरोड मार्गे राममंदिरात येईल. तेथे श्रीराम मंदिराच्या अध्यक्षा प्रणिती गिरमे, उपाध्ये परिवार, हमाल, मापाडी, व्यापारी व शेतकरी आदिंच्या वतीने पालखीची पुजा करण्यात येईल. त्यानंतर वारकऱ्यांना भंडारा देण्यात येणार आहे.

# प्रवरेच्या ओंकारची एसबीआयच्या कनिष्ठ सहायकपदी वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेअंतर्गत लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेतील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील माजी विद्यार्थी ओंकार दुबे यांची स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेत कनिष्ठ सहाय्यक पदावरती निवड झाली अशी माहिती प्राचार्य डॉ. निलेश दळे यांनी दिली.



महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रवरा कृषी शास्त्र संस्था विविध उपक्रम राबवत असते. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, मान्यवर व्यक्ती मार्गदर्शन व्याख्याने, कृषी आधारित औद्योगिक कंपनी भेटी, कार्यानुभव उपक्रम आदी उपक्रमाचा समावेश होतो.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकरी अधिकारी प्रा. डॉ. सुस्मिता विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, प्राचार्य डॉ. निलेश दळे आदींनी अभिनंदन केले आहे.

### बाभळेश्वर विद्यालयात श्रमदानासह प्रवेशोत्सव उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बाभळेश्वर** : राजकारणातून समाजकारण आणि या माध्यमातून सर्वांगीण विकास साध्य करणारे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रवरेच्या बाभळेश्वर येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये मंत्री विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्रमदान, वृक्षारोपण, नवीन शैक्षणिक विद्यार्थ्यांचे स्वागत उत्सव कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्याने ३२ गरीब विद्यार्थ्यांना गणवेश वाटप, गावातील विविध ठिकाणी श्रमदान वृक्षारोपण उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

### कृषीसाठी एआय धोरण मंजूर

अचूक माहिती मिळावी यासाठीचा प्रकल्प. शेतकऱ्यांना हवामानाधारित कृषि विषयक सल्ला व मार्गदर्शनासाठी महत्वाचा प्रकल्प. महाराष्ट्र कृषी- कृत्रिम बुद्धिमत्ता महाॲग्री-एआय धोरण २०२५-२०२९ मंजूर. कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर करून परिवर्तन घडविता येणार. कृत्रिम बुद्धीमत्ता, निर्मितीक्षम कृत्रिम बुद्धीमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, ड्रोन, संगणकीय दृष्टीक्षमता, रोबोटिक्स, पूर्वानुमान विश्लेषण यांचा वापर करत, राज्यातील ॲग्रीस्टॅक, महा-ॲग्रीस्टेक, महावेद, क्रॉपसॅप, ॲगमार्कनेट, डिजिटल शेतीशाळा, महा-डिबीटी यांसारखे प्रकल्प पुढे नेण्यास मदत होणार. मुंबई मेट्रो मार्ग-२अ, २ ब आणि ७ या मेट्रो प्रकल्पांकरिता एशियन डेव्हलपमेंट बँक व न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या कर्जास मुदतवाढ. विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका प्रकल्प आता बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर हाती घेण्यास मान्यता. आणीबाणीत कारावास भोगलेल्यांच्या मानधनात दुप्पटीने वाढ. ह्यात जोडीदारालाही मानधन मिळणार. गौरव योजनेमध्ये सुधारणा. अनिवासी भारतीयांच्या मुलांना, पाल्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश मिळणार. विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अनिवासी भारतीयांच्या व्याख्येत बदल. प्रवेश व शुल्क यांचे विनियमन अधिनियम, २०१५ मध्ये सुधारणा.

### संचालकांनो, बँकेला प्रगतिपथावर न्या

आली. त्या प्रित्यर्थ जीएस महानगर बँकेचे सभासद, कार्यकर्ते व हितचिंतक यांची आभार सभा पारनेर येथील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात नगर जिल्हा सहकारी बँकेचे पारनेर तालुका विकास अधिकारी भाऊसाहेब भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी आ. दाते म्हणाले की, राज्यातील सहकार क्षेत्र हे सामूहिक प्रयत्नांतून सर्वांगीण प्रगती साधणारी संकल्पना आहे. ग्रामीण भागातील आर्थिक विकासामध्ये राज्यातील सहकार क्षेत्राचा मोठा वाटा असल्यामुळे शेतकरी, लहान मोठे उत्पादक, उद्योजक यांना त्यांच्या कर्तृत्वाने एक सारखी संधी उपलध होत असते. सहकारात राजकारण नको, ही भूमिका माझ्यासह तालुक्यातील सर्वांनी ठेवली, असेही आ. दाते म्हणाले. या आभार सभेला बँकेच्या अध्यक्षा गितांजली शेळके, उपाध्यक्ष भास्करराव कवाद, माजी उपाध्यक्ष सिताराम अडसूळ, माजी संचालक भास्करराव खोसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, प्रभाकर कवाद, बाळासाहेब लामखडे, सभापती किसनराव रासकर, गणेश शेळके, गंगाराम बेलकर, सरपंच संतोष काटे, सुरेश बोरुडे, ठकाराम लंके, चेअरमन वसंतराव कवाद, निलेश खोडदे आदी उपस्थित होते. यावेळी सुरेश बोरुडे यांनी गीतांजली शेळके यांचा पुणेरी पगडी देऊन सत्कार केल्याने कार्यक्रमाला पुणेरी झळा प्राप्त झाली.

### काँग्रेस, राष्ट्रवादी आणि उबाठाकडे माणसे राहणार नाहीत: ना.महाजन

मिसकम्युनिकेशन झालं आहे. हे मी मान्यच करतो असे महाजन म्हणाले. हरकत नही घरचा कार्यक्रम आहे. ते मला तारीख माहित नाही असं बोलले असतील. कारण पक्षप्रवेश एक ते दोन दिवसात होईल असं ठरलं होतं. मात्र लगेच झाल्याने गोंधळ झाल्याचे महाजन म्हणाले.

### गुहातील हॉटेलात आढळले शिजलेले गोमांस

गुहा गावच्या शिवारातील हॉटेल मेवात व हॉटेल राणी मेवात एक इसम हा एका पातेल्यातून शिजलेले मांस बाहेर काढीत असताना दिसून आला. त्यास नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव मोहम्मद अली मोहम्मद सहून (रा. नई, ता. जि. मेवात, हरियाना) असे असल्याचे सांगितले. त्यावेळी पोलीसांनी त्यास पातेल्यात काय आहे, असे विचारले असता त्याने सदर पातेल्यात गोवंशीय जातीचे मांस असल्याचे सांगितले. यावेळी पोलिसांनी दोन्ही कारवाईत ६ हजार ६५० रुपये किंमतीचे ४५ किलो गोवंश जातीच्या जनावरांचे गोमांस करून जप्त करत त्यातील काही मांस केमिकल तपासणी करिता राखीव ठेवून उर्वरित मांस जागीच नष्ट केले आहे. याबाबत पोलीस नाईक प्रवीण बागुल यांच्या फिर्यादीवरून हॉटेल राणी मेवात व हॉटेल मेवातचा मालक मोहम्मद अली मोहम्मद सहुन यांच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शक सुरू आहे. कोल्हार, गुहा व परिसरातील हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या सतर्कतेमुळे हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून या कार्यकर्त्यांचे हिंदू समाज बांधवांनी कौतुक केले आहे.

### अबब.. आमदारांचा पाठपुरावा तर सभापतींचा खोडा

आता विद्यमान महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे हा प्रस्ताव प्रलंबित असून तो प्रस्ताव मंजूर करण्यात यावा, अशी मागणी आ. रोहित पवार यांनी त्यांच्याकडे केली. त्यासाठी त्यांनी काल, मंगळवारी मंत्री बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेऊन याबाबत चर्चाही केली. दरम्यान, एकीकडे आ. पवार हे कर्जतच्या क्रीडा संकुलाच्या जागेसाठी पाठपुरावा करत असताना दुसरीकडे विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी क्रीडा संकुलासाठीची जागा बदलण्याची मागणी महसूलमंत्र्यांकडे केली असून त्यासाठी त्यांनी बैठकही लावली आहे. यामुळे आ. पवार आणि विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या राजकीय खेळात कर्जतच्या क्रीडा संकुलासाठी आणखी किती दिवस वाटप पहावी लागणार आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### जप्त केलेले वाळूचे डंपर तहसील कार्यालयातून पळविले

स्वतःच्या फायद्यासाठी तहसील कार्यालयाच्या गेटचे कुलूप तोडून कार्यालयाची कुठलीही रीतसर परवानगी न घेता लबाडीने पळवून नेला. याबाबत शेवगाव पोलीसांनी तुकाराम विखे याच्यावर ३०३, ३२४ (४)प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील डंपर व आरोपी विखे हे फरार असल्याचे तपासी अधिकारी अरविंद चव्हाण यांनी सांगितले.

# महावितरण अधिकाऱ्यांची केली कानउघाडणी

## विजेच्या प्रश्नासंदर्भातील आढावा बैठकीत आ. ओगले आक्रमक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : प्रत्येक अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे, अन्यथा या पुढील काळात कोणाचीही गय केली जाणार नसल्याचे आमदार हेमंत ओगले यांनी स्पष्ट केले. मतदारसंघात सर्वात जास्त प्रश्न हे महावितरणचे असून जे प्रश्न वरिष्ठ कार्यालयाशी निगडित आहे ते सोडवण्यासाठी प्रयत्नशील आसल्याचे आमदार ओगले म्हणाले. श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघातील विजेच्या प्रश्नसंदर्भात आ. हेमंत ओगले यांच्या उपस्थितीत आढावा



बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी सभापती बाबासाहेब दिघे, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, माजी उपनगराध्यक्ष अंजुम शेख, मुजफ्फर शेख, राजेंद्र सोनवणे, दिलीप नागरे, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाऊलबुद्धे, सुरेश निमसे, गोरखनाना पवार, लकी सेठी, विलास दाभाडे, रितेश रोटे, कलीम कुरेशी, भरत कुंकूलोळ उपस्थित होते. गेल्या काही दिवसांपासून श्रीरामपूर शहर व ग्रामीण परिसरात मोठ्या प्रमाणात विजेचा लपंडाव चालू असून त्यासंदर्भात आमदार हेमंत ओगले यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते. सदर बैठकीला सर्व तालुक्यातून मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांनीच विजेच्या प्रश्न संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केले.

थोडा तरी पाऊस पडला तरी चोवीस- चोवीस तास विजेचा पुरवठा खंडित होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नसंदर्भात महावितरणचे कार्यकारी अभियंता अजय बंगाळे यांनी खुलासा केला. या पुढील काळात महावितरणचे सर्वच अधिकारी कर्मचारी ग्राहकांच्या सेवेत राहतील, असे आश्वासित केले. बैठकीचे सूत्रसंचालन रज्जाक पठाण यांनी केले तर आभार नगरसेवक मुजफ्फर शेख यांनी मांडले. यावेळी असिफ दारूवाला, रियाज पठाण, संजय गोसावी, निलेश नागले, प्रताप कवडे, दिपक वमने, संतोष परदेशी, अतुल खरात, सुनील साबळे, लखन सानप, अमोल नाईक, रितेश चव्हाणके, सतीश पाटणी, गणेश गायधने, सरबजीतसिंग चुग, बाबा वायदंडे, गणेश काते, रितेश गिरमे, झियान पठाण, वैभव कुरहे, कुणाल पाटील, परेश गाडेकर उपस्थित होते.

### अन्यथा आंदोलन करणार

माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, गेल्या काही महिन्यांपासून वीज पुरवठा मोठ्या प्रमाणावर खंडित होत आहे. त्याचा परिणाम हा दैनंदिन पाणीपुरवठ्यावर होताना दिसून येत असून नागरिकांसह, शेतकरी, व्यापारी हे सर्वच विजेच्या प्रश्नामुळे त्रस्त आहे. आमच्या संयमाचा अंत पाहू नका अन्यथा या पुढील काळात तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा करण ससाणे यांनी दिला.

---

# पतसंस्था फेडरेशनच्या संचालकपदी कवाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये पतसंस्था चळवळीत भरीव योगदान देणाऱ्या अहमदनगर जिल्हा पतसंस्था स्थैर्य निधी सहकारी संघाच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली. यामध्ये अध्यक्षपदी शिवाजीराव कपाळे व उपाध्यक्षपदी आजिनाथ हजारे यांची निवड झाली, तर पारनेर तालुक्यातुन बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंतराव बाबाजी कवाद यांची संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी अध्यक्ष कपाळे,



उपाध्यक्ष हजारे व संचालक कवाद यांच्या निवडी बद्दल अभिनंदन केलेले आहे. या निवडीने पारनेर तालुक्यातील पतसंस्थाच्या व निघोज परिसरातुन विविध संस्थाच्या वतीने वसंतराव कवाद यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

कवाद हे महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे नाशिक विभागाचे संचालक, पारनेर तालुक्यात अग्रेसर असलेला बाबासाहेब कवाद सेवाभावी संस्थेचे सचिव, राज्यभर प्रसिद्ध असलेल्या श्री मळगंगा देवस्थान ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष व निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे स्विकृत संचालक म्हणून कार्यरत आहेत.

---

# शहरातील वीज पुरवठा वारंवार खंडित

## नागरिक हैरण; महावितरणाच्या विरोधात असंतोष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : शहरातील महावितरणचा वीज पुरवठा वारंवार खंडित होण्याचे प्रमाण वाढत असून पाऊस नसतांना देखील विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. अगदी शनिवारपासून ते मंगळवार दुपारपर्यंत दिवसातून व रात्रीच्या वेळेत वारंवार तासंतास विद्युत पुरवठा खंडित



होण्याचे प्रमाण वाढले आहे. या वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे ग्राहक हैराण झाले आहे. सध्या वातावरणातील बदलत्या हवामानामुळे व उकाड्याने सर्वत्र पंखा व कुलरची गरज भासते. अशावेळी वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे घरातील लहान मुले तसेच वयोवृद्ध नागरिकांसह सर्वसामान्य नागरिकांना या उकाड्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. मागील चार दिवसांपासून तर दिवसातून दोन-तीन वेळा वीज पुरवठा खंडित होतोच होतो व रात्रीच्या वेळेतही एक दोन वेळेस वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण पाऊस नसतांना देखील वाढले आहे. यामुळे रहिवासी व व्यावसायिकांना वारंवार विद्युत प्रवाह खंडित होत असल्यामुळे मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. गेलेली लाईट पुन्हा कधी सुरू होणार याबाबत विचारणा करण्यासाठी महावितरणने ग्राहकांसाठी दिलेल्या टोल फ्री नंबर वर संपर्क केला असता संबंधित वायरमन अथवा लाईनमन तो भ्रमणध्वनी उचलत नसल्यामुळे ग्राहकांचा संताप अनावर होतो.

---




कोल्हार : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा हायस्कूल कोल्हार येथे नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवस चिमुकल्यांनी केक कापून साजरा केला. कोल्हार येथील डॉ.सुजय दादा विखे पाटील युवा मंचचे अक्षय मोरे आणि सर्व सहकारी यांनी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील के.जी वर्गाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. युवा मंचचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.याप्रसंगी के जी वर्गातील विद्यार्थ्यांच्या हस्ते केक कटिंग करण्यात आले. युवा मंचच्या वतीने उपस्थित विद्यार्थ्यांना चित्रकला साहित्य वितरित करण्यात आले. प्राचार्य सुधीर मोरे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. याप्रसंगी युवा मंचचे श्री अक्षय मोरे, पत्रकार संजय कोळसे, कोल्हार भगवतीपुरचे उपसरपंच प्रकाश खर्डे, कोल्हाळेश्वर पतसंस्थेचे चेअरमन भरत उर्फ आबा खर्डे, वसंतराव मोरे, नागपूर पशु व मत्स्य विज्ञान परिषदचे कार्यकारी सदस्य ऋषिकेश खांदे, विनोद कुमार गुगळे, उद्योजक श्रीकांत बेंद्रे,मयूर कडसकर,युवा मंचचे विनीत हिरानंदानी, अरुण बोरुडे, योगेश बोरुडे आदी उपस्थित होते.

---

# गौतम पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांना नोकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : कर्मवीर शंकरराव काळे एज्यूकेशन सोसायटीच्या कोळपेवाडी येथील गौतम पॉलिटेक्निक इंस्टीट्युटच्या तृतीय वर्ष ईलेक्ट्रिकल विभागाच्या ३३ विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीसाठी निवड झाली असल्याची माहिती गौतम पॉलिटेक्निक इंस्टीट्युटचे प्राचार्य प्रा. सुभाष भारती व प्लेसमेंट अधिकारी प्रा. कैलास भोसले यांनी दिली आहे. यामध्ये कमिंस इंडिया मध्ये ५, आय. एफ. बी. मध्ये २, इंडोस्कल्प ऑटोकॉम्प्स मध्ये ८ व आकाश प्रेकिसिओन कॉम्पोनेटस मध्ये १८ अशा एकूण ३३ विद्यार्थ्यांना




निकालापूर्वीच नोकऱ्या मिळाल्यामुळे विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरवर्षी महाविद्यालयातील तृतीय वर्षातील सर्वच विद्यार्थ्यांना निकालापूर्वीच नामांकित कंपन्या नोकरीत सामावून घेत आहे. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे कर्मवीर शंकरराव काळे एज्यूकेशन सोसायटीचे चेअरमन मा.आ.अशोकराव काळे, विश्वस्त आ.आशुतोष काळे, व्हा. चेअरमन छबुराव आव्हाड, मानद सचिव चैतालीताई काळे, संस्थेचे सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य, प्रशासकीय अधिकारी प्रा.नारायण बारे, प्राचार्य प्रा.सुभाष भारती, कार्यालयीन अधीक्षक आण्णासाहेब बढे यांनी अभिनंदन केले आहे.

याबद्दल संस्थेच्या सचिव चैतालीताई काळे यांनी सांगितले की, इलेक्ट्रिक विभागातील ३३ विद्यार्थ्यांना अंतिम निकाल जाहीर होण्यापूर्वीच नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळाली आहे. ही एक उल्लेखनीय आणि इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी बाब आहे. हे यश विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे, शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे आणि महाविद्यालयाच्या प्रशिक्षण व प्लेसमेंट सेलच्या सक्रिय कार्याचे फलित आहे.

---

# आ. दाते यांच्याकडून नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांची सुरुवात होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना आंनददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या उद्देशाने शाळा प्रवेशोत्सव हा उपक्रम साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

त्यानुसार आ. काशिनाथ दाते यांच्या उपस्थितीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टाकळी ढोकेश्वर, वारणवाडी व गुरेवाडी येथे इयत्ता १ ली तील नवप्रविष्ट विद्यार्थ्यांचा शालेय प्रवेशोत्सव सोहळा संपन्न झाला. आ. दाते यांनी नवप्रविष्ठ विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून विद्यार्थ्यांचे स्वागत करुन विद्यार्थ्यांशी संवादही साधला.



यावेळी आ. दाते यांच्या सोबत पारनेर तालुका खरेदी विक्री संघाचे माजी चेअरमन ॲड. बाबासाहेब खिलारी, टाकळी ढोकेश्वर सेवा संस्थेचे चेअरमन बबनराव पायमोडे, माजी सरपंच शिवाजी खिलारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे, काकणेवाडीचे सरपंच गिताराम वाळुंज, भगवान वाळुंज, दत्ता आहेर, संपत आहेर, अंकुश काशिद, अर्जून पिंगळे, नथु काशिद यांसह शिक्षक, विद्यार्थी, स्थानिक शाळांच्या शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, नागरिक व पालकवर्गही मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

आ . काशिनाथ दाते म्हणाले की, 'चला शाळेत जाऊ' हा शासनाचा अतिशय स्तुत्य असा उपक्रम असुन आजच्या या शाळा प्रवेशोत्सव उपक्रमामुळे विद्यार्थी, शिक्षक, पालक व समाज यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक होऊन राज्याच्या शैक्षणिक प्रगतीस मदत होईल.

---

# ऊस शेती कार्यशाळेस शेतकऱ्यांचा प्रतिसाद



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : येथील मना बाबा मळ्यामध्ये ऊस शेती व सेंद्रिय शेती यावरील विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन कुषक गटाचे सदस्य कल्याण खर्डे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. कार्यशाळेला कृषी अधिकारी श्रीमती विनया बनसोडे (राहाता), ज्ञानेश्वर खर्डे (संचालक, विखे पाटील कारखाना प्रवरानगर), कोल्हार बु. ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सविता खर्डे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मना बाबा मळ्यातील अनेक महिला आणि पुरुष शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमात ऊस शेती कशी फायदेशीर होऊ शकते, यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. रोपवाटिकेपासून थेट लागवड केल्यामुळे मजुरी व आर्थिक खर्च कसा कमी करता येतो हे कृषी अधिकारी श्रीमती बनसोडे यांनी साध्या भाषेत समजावून सांगितले. तसेच सेंद्रिय शेतीचे महत्त्व, जैविक खतांचा वापर, जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्याचे उपाय, व सेंद्रिय ऊस उत्पादन वाढवण्याचे धोरण यावर मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांनीही प्रश्न विचारून सहभाग दर्शवला.

यावेळी कृषी अधिकारी विनय भाकरे, उप कृषी अधिकारी (लोणी) श्रीमती वैशाली अडसुरे, उप कृषी अधिकारी (लोणी), मीना जाधव (सहाय्यक कृषी अधिकारी, कोल्हार) प्रगतीशील शेतकरी भागवत शेळके, दिनेश खर्डे व इतर सर्व प्रगतीशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमानंतर ज्ञानेश्वर पाटील खर्डे यांनी सांगितले की, नामदार साहेबांच्या वाढदिवसाच्या निमित्त प्रत्येक शेतकऱ्याच्या दारापर्यंत जाण्याचा संकल्प केलेला आहे या उपक्रमातून प्रेरणा घेऊन कोल्हार बुद्रुक येथील प्रत्येक वस्तीवर अशाच कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत, जेणेकरून जास्तीत जास्त शेतकरी सेंद्रिय ऊस शेतीकडे वळतील.''

---

# महावितरण विरोधात अर्धनग्न आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**गंगापूर** : शहरात गेल्या वीस दिवसांपासून सुरू असलेल्या पाणीकपातीने नागरिकांचे जगणेच कठीण झाले आहे. याबाबत नगरपरिषद प्रशासनाने कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्याने सोमवारी संतप्त युवकांनी अर्धनग्न अवस्थेत थेट नगरपरिषद कार्यालयासमोर धडक दिली.

आक्रमक घोषणाबाजी करत त्यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेचा तीव्र निषेध व्यक्त केला. नगरपरिषदेत नुकत्याच मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती झाली असून त्यांच्या पहिल्याच दिवशी युवकांच्या आंदोलनामुळे प्रशासनाची झोप उडाली.

या आंदोलनात अमोल जगताप, राहुल वानखेडे, वाल्मीक शिरसाठ, आकाश बुचडे, नवनाथ कानडे, पृथ्वीराज तोगे, स्वप्निल गायकवाड ,विशाल गव्हाणे, जावेद शेख, शुभम बोडखे, रवी गव्हाणे, युनूस शेख, रियाज शेख, यांच्यासह शेकडो युवकांनी सहभाग नोंदवला. या वेळी सर्व युवकांनी एकत्र येत पाण्याच्या समस्येवर त्वरित उपाययोजना करण्याची मागणी केली.

---

# उंबरीबाळापूर येथील शेतकऱ्यावर बिबट्याचा हल्ला

## नशिब बलवत्तर म्हणून मोठी हानी टळली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : उंबरीबाळापूर (ता. संगमनेर) येथील शेतकरी मच्छिंद्र दगडू कालेकर (वय ५६) यांच्यावर मंगळवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास जनावरांसाठी गिनी गवत तोडत असतांना बिबट्याने प्राणघातक हल्ला जखमी झाले. घटनेची माहिती तात्काळ जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिली त्यांनी अतात्काळ पिंजरे लावण्याच्या सूचना वनविभागाला दिली असल्याची माहिती पद्मश्री डॉ. विठ्ठलराव



विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक विजयराव म्हसे यांनी दिली. याबाबत मिळालेली सविस्तर माहिती अशी की, संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर शिवारातील कारवाडी येथील मच्छिंद्र दगडू कालेकर हे नेहमीप्रमाणे शेतात जनावरांसाठी गिनी गवत आणण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या समवेत पत्नी आणि मुलगा जीवन कालेकर देखील होते. त्यांची पत्नी व मुलगा शेतातील इतर काम करत होते. तर, मच्छिंद्र कालेकर हे गवत तोडत असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर हल्ला चढविला. जवळचं असलेल्या पत्नी व मुलाने प्रसंगसावधान राखत जोरदार आरडाओरडा करत तिकडे धाव घेतल्यामुळे बिबट्याने तेथून धूम ठोकली.

गेल्या काही दिवसांपासून उंबरीबाळापूर येथे प्राण्यावर बिबट्याचे हाल्ले होत होते. पण आज सकाळीच बिबट्याने माणसांवर हल्ला केल्यामुळे परिसरामध्ये भिंतीचे वातावरण आहे. वनविभागाने मोठ्या प्रमाणात पिंजरे लावुन बिबट्या जेरबंद करावे, अशी मागणी जीवन कालेकर यांनी केली आहे.

घटना स्थळाच्या ५ कि. मी. च्या आतमध्ये ३ पिंजरे लावण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी तसेच नागरीकांनी घाबरून जाऊ नये. वनविभागत बिबट्या पकडण्यासाठी शेतकऱ्यांना पुर्ण सहकार्य करणार आहे.
**रमेश पवार, वन परिमंडल अधिकारी.**

---

# जावयाने मारला सासूच्या घरी डल्ला

## पोलिसांनी केले ४८ तासात गजाआड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : जावयाने सासुच्या घरी डल्ला मारून सुमारे २ लाखांचे सोने लंपास केले होते. शहर पोलिसांनी अवघ्या ४८ तासात या चोरीचा तपास करून आरोपीला गजाआड केली. याबाबत अधिक माहिती अशी की, श्रीरामपूर शहरातील वार्ड नं.०२, जुने घरकुल, रेल्वे लाईन परिसरात राहणाऱ्या रुकय्या जब्बार शेख या लोणी येथे नातेवाईकाकडे गेल्या होत्या. तेव्हा रुकय्या जब्बार शेख या घरी नसल्याचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांच्या राहत्या घराची कडी सांध्यातून विचकटवुन सुमारे २,०४,००० किंमतीचे सोन्याचे दागिने रोख रकमेसहीत चोरुन नेले होते. श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे रुकय्या शेख यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवित सदर महिलेचा जावई साद शौकत शेख यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केली असता सासू रुकय्या शेख हिने उसने पैसे दिले नाही म्हणून त्याचा राग येऊन गुन्हा केला असल्याची कबुली देऊन गुन्ह्यात चोरी केलेला ऐवज परत केला.

# मंत्री विखेंच्या वाढदिवसानिमित्त आयटीआयमध्ये वृक्षारोपण

## प्लेसमेंट कॅम्पस आयोजनातून २९ प्रशिक्षणार्थ्यांना नोकरीची मिळाली संधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या विळद घाट, अहिल्यानगर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे राज्याचे जलसंपदा मंत्री व अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ६६ व्या वाढदिवसानिमित्त प्लेसमेंट कॅम्पस आणि वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रशिक्षणार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये अहिल्यानगर एमआयडीसीमधील Classic Wheels Ltd आणि Kaizen Engineering Pvt. Ltd. या नामवंत कंपन्यांनी सहभाग घेतला. त्यांनी एकूण ९० प्रशिक्षणार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. यामध्ये Classic Wheels Ltd. ने १५ आणि Kaizen Engineering Pvt. Ltd.ने १४ प्रशिक्षणार्थ्यांची निवड केली. एकूण २९ प्रशिक्षणार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली. त्यामध्ये फिटर ५, वेल्डर ६, मोटार मेकॅनिक ६, मशिनिस्ट ६, इलेक्ट्रिशियन ३, वायरमन २, टर्नर १ यांचा समावेश आहे.

### विद्यार्थ्यांना उद्योगानुभव घेण्यासाठी उपयुक्त

गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणामुळे प्रशिक्षणार्थ्यांना थेट औद्योगिक क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळत आहेत. संस्थेचे एमआयडीसीमधील स्थान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगानुभव घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.



कार्यक्रमात वृक्षारोपण उपक्रमही राबवण्यात आला. पर्यावरण रक्षणाचा संदेश देत शिक्षक, प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांनी विविध प्रकारचे वृक्ष लावले. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणावर होणाऱ्या परिणामाच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. पी. एम. गायकवाड, सुनील कोल्हापुरे, डॉ. अभिजीत दिवटे, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी आणि संपूर्ण आयटीआय टीमचे मोलाचे योगदान लाभले. या यशस्वी उपक्रमाबद्दल सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

# नाटेगाव सरपंचपदी कोल्हे गटाचे गणेश मोरे यांची वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** तालुक्यातील नाटेगांव ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी कोल्हे गटाचे गणेश आप्पासाहेब मोरे यांची बिनविरोध निवड झाली. त्याबददल त्यांचे संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी अभिनंदन केले आहे.

निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून मच्छिंद्र पोकळे व सहायक म्हणुन ग्रामसेवक सिध्दार्थ काळे यांनी काम पाहिले. गणेश मोरे यांच्या नावाची सुचना जयवंत बाबासाहेब मोरे यांनी केली.

नवनिर्वाचित सरपंच गणेश आप्पासाहेब मोरे यांचा यावेळी सत्कार करण्यांत आला. सत्कारास उत्तर देताना ते म्हणाले की, युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली नाटेगाव ग्रामपंचायत अंतर्गत विविध जनविकासाच्या योजना राबवुन गांवचा कारभार आदर्श करण्यावर भर देऊ. याप्रसंगी सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे संचालक त्रंबकराव सरोदे, कोपरगांव बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम, डी. पी. मोरे, रामदास मोरे, डॉ. गोरक्षनाथ मोरे, राजेंद्र मोरे, नारायण मोरे, आप्पासाहेब मोरे, दगु मोरे, रामनाथ मोरे, शरद मोरे, बाबासाहेब मोरे, जयराम मोरे, ताराचंद मोरे, दत्तात्रय मोरे, गोरख मोरे यांच्यासह विविध संस्थांचे आजी-माजी पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक-पालकांच्या एकत्रित प्रयत्नाने विद्यार्थी घडतो

## बापुसाहेब डोके; डोके विद्यालयात नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शाळेतून मिळालेले संस्कार हे जीवनात नेहमीच मार्गदर्शक असतात. शाळा ही आपल्या जीवनाला आकार देणारी संस्था आहे. आजचा विद्यार्थी ही भविष्यातील देशाचा नागरिक असल्याने तो सक्षम व सुदृढ असणे गरजेचे आहे. शासनाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी विविध योजना राबवत आहेत.

या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी घेऊन आपली प्रगती साधली पाहिजे. शिक्षक आणि पालकांच्या एकत्रित प्रयत्नाने विद्यार्थी घडत असतो.




आज विद्यार्थ्यांना मिळालेल्या पाठ्यपुस्तके व शालेय साहित्याचा उपयोग करुन चांगला अभ्यास करावा.

विशेषत: मोबाईलचा उपयोग गरजेपुरताच करावा शाळेमध्ये लक्ष द्यावे. केवळ शिक्षणासाठी मोबाईलचा वापर करावा, असे प्रतिपादन लक्ष्मीबाई शांताराम डोके समाज विकास प्रतिष्ठान या संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके यांनी केले. निर्मलनगर येथील डोके विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प व पाठ्यपुस्तके देऊन करण्यात आले.

अभ्यासाबरोबरच इतर स्पर्धा, परिक्षांसाठीही विद्यार्थ्यांची तयारी करुन घेण्यात येत असल्याने विद्यार्थीही यश संपादन करत आहेत. त्यामुळे शाळेच्या लौकिकात भर पडत आहे. आज विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्पदेऊन स्वागत केले आहे, त्याचबरोबर मोफत पाठ्यपुस्तके वाटप करुन वर्षभरातील उपक्रमातून विद्यार्थ्यांची प्रगती साधली जाईल.

**– बापूसाहेब डोके**

यावेळी समन्वय समितीचे कारभारी गायकवाड, छबुराव ठोकळ, शोभा भालेराव, बाळू वाघुले मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, संभाजी पवार,ज्योती पवार, सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, राणी राऊत, संजोत बर्वे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदाकिनी पांडूळे यांनी केले. तर आभार आशा धामणे यांनी मानले. यावेळी शिक्षक, पालक उपस्थित होते. नवीन पुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांचे चेहरे आनंदून गेले होते.

# बिबट्याचे पिल्लु वाचविण्यात प्राणीमित्राला यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर :** राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथे बिबट्याच्या पिल्लाला वाचवण्यात प्राणीमित्र विकास म्हस्के यांना यश आले.

माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या वस्ती शेजारील शेतामध्ये कामगार काम करत असताना त्यांना बिबट्याचा आवाज आला. त्यांना तो आवाज खुप दूरवरून येत आहे, असा भास झाला. परंतु ज्यावेळेस कामगारांची साडेपाच वाजता सुट्टी झाली आणि ते विहिरीजवळ आले. तेव्हा त्यांना विहिरीतून पिल्लाचा आवाज आला.

विहिरीच्या कपारीला आसरा घेतलेल पिल्लु त्यांना दिसले. डॉ. प्रमोद म्हस्के यांनी लगेच प्राणीमित्र विकास म्हस्के यांना फोन करून माहिती दिली. प्राणीमित्र तात्काळ घटनास्थळी पोहचले व घटनेची माहिती उपवनसंरक्षक अधिकारी धर्मवीर शालविठ्ठल, सहाय्यक उपवनसंरक्षक गणेश मिसाळ, वनपरिक्षेत्र अधिकारी युवराज पाचरणे यांना माहिती दिली.



विहिरीच्या कडेने चारही बाजूने ऊस शेती आणि ऊस डोक्याच्या वर वाढलेला असल्याने मादी याच ऊसात असल्याने आवाज करत व पत्रा वाजवत बिबट्यावर लक्ष ठेवत, संध्याकाळची वेळ अंधार पडायला सुरुवात झाली असतानाही प्रसंगावधान राखत दोरीच्या साह्याने क्रेट विहिरीत सोडून पिल्लाला अलगद बाहेर काढण्यात यश आले आहे.

# भापसे शिक्षण संस्थेत नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** कन्या विद्यालय निंबोडी फाटा व कै. सौ. शशिकला बाबुराव भापसे ज्युनिअर कॉलेज, देवराई येथे सोमवारी शाळेच्या पहिल्याच दिवशी नर्सरी ते बारावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचे चैताली भापसे व शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी कुशल भापसे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना



चॉकलेट पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

तसेच भापसे शैक्षणिक संकुलनाच्या प्रांगणामध्ये माजी आ. बाबुराव भापसे यांच्या नावाने उभारण्यात आलेल्या स्वागत कमानीचा लोकार्पण सोहळा चैताली भापसे, सेक्रेटरी कुशल भापसे, प्राचार्य तांदळे, प्राचार्य आरोळे व सर्व शिक्षक, विद्यार्थी यांच्या प्रमुख उपस्थित पार पडला.

अतिशय उत्साहापुर्ण वातावरणामध्ये या चिमुकल्यांचे जोरदार स्वागत शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसह शिक्षकांकडून करण्यात आले. आजूबाजूच्या विविध गावच्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याने विद्यार्थ्यांची संख्या देखील मोठी होती.

भापसे विद्यालयात शाळेच्या पहिल्या दिवशी नवगतांचे स्वागत आलेल्या चिमुकल्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले. आ. प्रसाद लाड व संस्थेच्या विश्वस्त नीता लाड, संगिता भापसे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिक्षण संस्थेने नर्सिंग कॉलेज तसेच इतर अनेक मोठमोठे शैक्षणिक उपक्रम हाती घेतले आहे.

**– कुशल भापसे, सेक्रेटरी**

# पद्मश्री पवारांनी लुटला निसर्ग पर्यटनाचा आनंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पद्मश्री पोपटराव पवार यांना नेहमीच अनेक ठिकाणच्या वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या व्यस्ततेमुळेत्यांना निवांत वेळ मिळत नाही,परंतु आज मात्र संध्याकाळी आवर्जुन वेळ काढून त्यांनी नगर जवळील कल्याणरोड येथील ढवळपुरी येथील अंकुर व्हॅली कृषी पर्यटन केंद्रास भेट दिली.

या ठिकाणी केलेली निसर्गाची जपणुक राखलेला पर्यावरणाचा समतोल आणि फारसा फेरबदल न करता येथीलच निसर्गरचनेचा आणि संसाधनांचा वापर करून



अतिशय सुंदर आणि निसर्गरम्य असे पर्यटन केंद्र उभारल्या बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

रोजच्या धकाधकीच्या आयुष्यात आणि प्रदुषणाच्या विळख्यात सापडलेल्या शहरांमध्ये राहत असताना प्रत्येकालाच विरंगुळ्याचे आणि निवांत क्षण हवेहवेसे वाटतात आणि आजकाल मध्यमवर्गीय माणुस सुध्दा शरीर आणि मनावरील ताणतणाव कमी करण्यासाठी पर्यटनाचा आनंद घेतात.

अंकुर व्हॅली येथे साहसी पर्यटनामधील झिपलाईन झिपसायकल स्काय रोलर झुलता पूल आर्चरी नेट क्लायबिंग असे अनेक खेळ उपलब्ध आहेत मुळातच स्पोर्टमन असल्याने त्यांनी झिप सायकलचाही आनंद लुटला. या परिसरात फेरफटका मारताना अनेक ठिकाणी फोटोग्राफीचाही आनंद घेतला. संध्याकाळी निवांत तळ्याकाठी स्वादिष्ट जेवणाची मेजवानी घेऊन अनेक आठवणी ठेवून ते बाजारहिवरेकडे रवाना झाले. यावेळी त्यांचे समवेत रंगाशेठ रोहोकले, बबलुशेठ रोहोकले, डॉ. संजय बांडे तसेच हिवरे बाजार येथील कार्यकर्ते उपस्थित होते.

### डॉ. भनगडे यांच्याकडून पवारांचे स्वागत

पोपटराव पवार यांचे संध्याकाळी अंकुर व्हॅली येथे आगमन झाले. डॉ. राजेश भनगडे यांनी त्यांचे स्वागत केले. आल्यानंतर त्यांनी संपुर्ण परिसरात फेरफटका मारुन सर्व ठिकाणची असणारी पुर्वस्थिती झालेला बदल त्यासाठी केलेलं काम याविषयी सखोल माहिती घेतली. तसेच अनेक निरीक्षणेही नोंदवली. त्याचप्रमाणे मार्गदर्शनही केले. यावेळी त्यांच्या अभ्यासु वृत्तीचे दर्शन झाले.

# ... आठ दिवसांत पगार न दिल्यास उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** बुऱ्हानगर येथील व्हिडिओकॉन कंपनीत काम करणाऱ्या ३२ कामगारांचा मार्च २०१८ पासून नोव्हेंबर २०२३ पर्यंतचा पगार थकीत असून, त्या पगारासाठी अखेर नगर जिल्हा मजदूर सेनेने न्यायालयाचा दरवाजा ठोठावला व औद्योगिक न्यायालयात याविषयी दावा दाखल केला होता.

न्यायालयाने या प्रकरणात कामगारांच्या बाजूने निकाल देत जिल्हाधिकारी यांना कामगारांचा थकीत पगार व्याजासह ३ कोटी ७५ लाख ८५ हजार



१४० इतकी रक्कम तातडीने अदा करण्याचे आदेश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर नगर जिल्हा मजदूर सेनेचे अध्यक्ष बाबूशेठ टायरवाले यांच्या नेतृत्वाखाली व्हिडिओकॉन कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.

यावेळी बाबूशेठ टायरवाले यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, कामगारांनी ८ वर्षे संयमाने वाट पाहिली आहे. आता न्यायालयाचा आदेश आहे, तरीही प्रशासन दुर्लक्ष करीत असेल तर ८ दिवसांनंतर आम्हाला आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल. याची पूर्ण जबाबदारी प्रशासनाची असेल.

यावेळी विद्या पवार, आरती बागडे, सुनिता तेलधुणे, सपना भिंगारदिवे, शैला रासने, सुनीता चक्रे, बिजला लांडे, विजया धुमाळ, अनिल झावरे, पाराजी पानसंबळ, नितीन गांधी, रवींद्र कुदळे, आप्पा पाटील, संजय राजुरकर, लक्ष्मण लोखंडे, अनिल पंकज, साहेबराव गायकवाड, अतुल पानसरे आदी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बचतगटाच्या माध्यमातून राबविलेले स्तुत्य उपक्रम

## राष्ट्रवादीच्या महिला उपाध्यक्ष वाल्हेकर; हडकोत बचत गटाकडून विविध कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील प्रेमदान हडको येथील आवंती बचत गट व शार्वी बचत गटाच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उपाध्यक्ष सुनीता वाल्हेकर यांनी दिली.

यामध्ये विविध स्पर्धा घेण्यात आल्या तसेच महिलांना मार्गदर्शन व ज्यांचे वाढदिवस आहेत त्यांचा वाढदिवस साजरा करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी अवंती बचत

बचत गटातील महिलांनी बचत करणे व गुंतवणूक करणे व उद्योग व्यवसाय करणे एवढ्या पुरतेच मर्यादित न राहता त्यांचे कुठेतरी मनोरंजन व्हावे,कौतुक व्हावे, आपली कला सादर करता यावी यासाठी हा उपक्रम आम्ही या महिन्यापासून सुरू केला आहे आणि त्याला प्रतिसादही चांगला मिळत आहे.

**– सुनीता वाल्हेकर,** उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस



गटाच्या अध्यक्ष सुनीता वाल्हेकर सचिव अर्चना भंडारी, शार्वी बचत गटाच्या अध्यक्ष शोभा कानडे, सचिव जयमला लोखंडे यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेत प्रथम क्रमांक रेखा कानडे, द्वितीय क्रमांक अर्चना लोखंडे, तृतीय क्रमांक शोभा पतंगे यांना मिळाला त्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देण्यात आली.

# वारकऱ्यांच्या सेवेसाठी टँकरसह २५ डॉक्टरांचे पथक

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांना विविध सोईसुविधा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** मोठी समृद्ध परंपरा लाभलेल्या पायी दिंडी सोहळ्यातील संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचे संगमनेर तालुक्यात आगमन झाले असून महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या सूचनेनुसार आलेल्या सर्व वारकऱ्यांना पिण्याचे पाणी, आरोग्याच्या सुविधेसह विविध सुविधा पुरविल्या जात असून यामुळे वारकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी अहिल्यानगर जिल्ह्यात आली असून माजी आ. डॉ. सुधीर तांबे व इंद्रजीत थोरात यांनी या पालखीचे स्वागत केले. याचबरोबर माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी पालखीचे अध्यक्ष ॲड. सोमनाथ घोटेकर यांच्यासह गावकरी व वारकऱ्यांशी संवाद साधला. याचबरोबर वारकऱ्यांच्या सेवेसाठी एसएमबीटी सेवाभावी संस्थेच्या वतीने दोन ॲम्बुलन्स २५ डॉक्टरांचे पथ, नर्स अशी आरोग्य सेवा देण्यात आली आहे.

इंद्रजीत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांना चांगल्या सुविधा देण्याकरता सर्व पाहणी करण्यात आली. याचबरोबर आवश्यक त्या बाबी पुरवण्यात आल्या. वारकरी हा अतिथी असून त्याचे उस्फुर्त स्वागत ही परंपरा संगमनेर तालुक्याने कायम जपले आहे.

**– ॲड. त्रिंबक गडाख**



प्रत्येक गावामध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर, वारकऱ्यांसाठी चहा, नाष्टा, राहण्याची सुविधा, अशा अद्यावत सुविधा पुरवल्या आहेत. इंद्रजीत थोरात यांच्या नेतृत्वाखाली अमृत उद्योग समूहाच्या वतीने विविध सहकारी संस्थांनी दरवर्षीप्रमाणे ही सेवा दिली आहे. यामध्ये पहिल्या दिवशी ११८९ वारकऱ्यांची तपासणी करण्यात आली.

दिंडीमध्ये येणारे वारकरी दरवर्षी संगमनेर तालुक्यामध्ये आल्यानंतर त्यांची अत्यंत चांगली सोय केली जाते. यामुळे वारकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असते. दिंडीचे प्रमुख ॲड. सोमनाथ घोटेकर म्हणाले की, संत निवृत्तीनाथ महाराज पालखीला मोठी ऐतिहासिक महत्त्व आहे. अमृत उद्योग समूह व यशोधन कार्यालयाच्या वतीने पुरविण्यात आलेल्या विविध सुविधांबद्दल सहभागी झालेल्या सुमारे २५००० वारकऱ्यांनी समाधान व आनंद व्यक्त केला आहे हरिनामाच्या गजरात हे वारकरी आता पंढरपूरकडे रवाना होत आहे.

### वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेचे समाधान : डॉ. थोरात

महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा असून वारीमध्ये लहान मोठा जात धर्म असा कोणताही भेदभाव नसतो सर्वजण एकरूप होवून पांडुरंगाच्या चरणी लीन होतात. माऊली म्हणून एकमेकाचा आदर करतात या वारकऱ्यांची आरोग्य सेवा करणे हा मोठा आनंद असल्याचे कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्री थोरात यांनी म्हटले आहे.

# वॉल्व्ह तुटल्याने शेकडो लिटर पाणी वाया

## नगरपालिकेचे दुर्लक्ष; मुख्याधिकारी कर्मचाऱ्यांपुढे हतबल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शहरातील गोंधवणी भागात सध्या रस्त्याच्या दुरुस्तीचे आणि नवीन पाण्याच्या पाइपलाईन टाकण्याचे काम नगरपालिकेच्या वतीने युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, या कामादरम्यान गंभीर निष्काळजीपणा समोर आला असून, पाइपलाईनमध्ये बसवलेला एक वॉल अचानक निघून गेल्याने जवळपास हजार लिटरहून अधिक पिण्याचे पाणी वाया गेले. ही बाब महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष स्वप्निल सोनार यांच्या निदर्शनास येताच, त्यांनी तत्काळ नगरपालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत संबंधित घटनेची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, मुख्याधिकारी घोलप यांनी तात्काळ कृती करत आपले तांत्रिक कर्मचारी घटनास्थळी पाठवले. मनसेच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी देखील



प्रशासनास सहकार्य करत घटनास्थळी उपस्थिती लावली. मनसेच्या सूचना आणि प्रशासनाच्या तत्परतेमुळे काही वेळातच तुटलेला व्हॉलव्ह बंद करण्यात आला आणि पाण्याचा अपव्यय थांबवण्यात यश आले. यामुळे परिसरात आणखी मोठे नुकसान होण्यापासून बचाव झाला. पाईपलाईनच्या कामादरम्यान सुरक्षेच्या आणि कार्यक्षमतेच्या दृष्टीने आवश्यक खबरदारी घेणे अपेक्षित असताना, सार्वजनिक मालमत्तेच्या व्यवस्थापनातील गंभीर त्रुटी आहे, असे मनसेने निदर्शनास आणून दिले आहे. स्वप्निल सोनार यांनी या संदर्भात अधिकाऱ्यांना जाब विचारत अशा निष्काळजीपणाच्या घटना पुन्हा घडू नयेत, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले. शहराध्यक्ष सोनार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, "शहरातील नागरिकांना सातत्याने पुरेसे व स्वच्छ पाणी मिळावे यासाठी आम्ही झटत आहोत. अशा पद्धतीने कामात निष्काळजीपणा केल्यास नागरिकांचे नुकसान होते. आज जर आम्ही वेळेत लक्ष दिले नसते, तर हजारो लिटर पाणी वाया गेलेच असते, शिवाय इतर घरांना पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला असता." गोंधवणी परिसरातील काही रहिवाशांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

### कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

या संपूर्ण प्रकारामुळे नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, अशा घटनांपासून धडा घेत भविष्यात यंत्रणांनी अधिक जबाबदारीने काम करावे, अशी जनतेतून मागणी होत आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेच्या सतर्कतेमुळेच वेळेवर उपाययोजना होऊन मोठा अपघात टळला, ही बाब नोंद घेण्याजोगी ठरते.

# आमदार हेमंत ओगलेंच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** नगरपालिकेच्या शाळेत इयत्ता पहिलीमध्ये नव्याने दाखल पात्र विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचे स्वागत ढोल ताशांच्या गजरात करण्यात आले. विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, शालेय साहित्य, पाठ्यपुस्तके इत्यादींचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. सदर प्रवेशोत्सवास तालुका गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, श्रीरामपूर नगरपरिषद शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी संजीवन दिवे मान्यवर उपस्थित होते.

आमदार ओगले यांनी आपल्या मनोगतामध्ये शाळेचे बदललेले रूप व शैक्षणिक सुधारणा यावर समाधान व्यक्त केले. शाळेचा विकास व प्रगती करण्यासाठी सर्वोत्परी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांनी शिक्षणातील होणारे बदल पाहता शाळेची प्रगती ही उत्तम असल्याचे सांगितले. सदर कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सुनीता मोरगे, सदस्या माजी नगरसेविका भारती परदेशी, कविता थोरात आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय धाकतोडे यांनी केले.

# ढेरंगे यांचे ऑनलाईन व्याख्यान

**जनता आवाज वृत्तसेवा**



**लोणी :** 'वाचावे ते आम्ही' या बोध वाक्याचे अनुसरण करणारे वाचकपीठ प्रतिष्ठान आपल्या स्थापनेचा पाचवा वर्धापन दिन साजरा करीत आहे. यानिमित्ताने सुप्रसिद्ध कवी, लेखक, पत्रकार श्रीकांत ढेरंगे यांचे 'मराठी भाषा संवर्धन आणि वाचन संस्कृती' या विषयावर ऑनलाईन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्राचार्य चंद्रकांत भोसले आणि प्रसिध्दी प्रमुख गिरीश सोनार यांनी दिली.

कोविड काळामध्ये साहित्य, नाट्य, कला, संस्कृती ही ज्ञानवर्धनाची सर्व दालने बंद झालेली असताना प्राचार्य चंद्रकांत भोसले, भास्कर निर्मळ तसेच इतर समविचारी मित्रांनी एकत्र येऊन जून २०२० मध्ये वाचकपिठाची स्थापना केली. वाचकपिठाच्या माध्यमातून त्यांनी दर महिन्याला एका उत्तम काव्यसंग्रहाची निवड करून त्यावर साहित्य क्षेत्रातील तज्ज्ञ, कवी, लेखक, साहित्यिक यांच्याद्वारे चर्चा घडवून आणण्यासाठी ऑनलाइन काव्यचर्चेचा कार्यक्रम सुरू केला. आजपर्यंत काव्य चर्चेचे एकूण ६१ कार्यक्रम संपन्न झालेले आहेत व त्यातून साहित्य क्षेत्रातील १७५ पेक्षा जास्त विद्वानांनी वेगवेगळ्या कवींच्या कवितासंग्रहांवर अभ्यासपूर्ण भाष्य केले आहे.

# बेलापूर ग्रामपंचायतीचा वृक्षवाटप उपक्रम स्तुत्य

## धनश्री विखे पाटील; ना. विखे पाटलांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बेलापूर ग्रामपंचायतीचा वृक्षवाटपाचा उपक्रम स्तुत्य आहे. प्रत्येकाने आपला वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा करावा, असे आवाहन धनश्री सुजय विखे पाटील यांनी केले. अहमदाबाद विमान अपघाताच्या पार्श्वभूमीवर ना. विखे पाटील यांनी आपला वाढदिवस वृक्षारोपण किंवा सामाजिक उपक्रमाने साजरा करण्याचे आवाहन केले होते. त्यास प्रतिसाद देत बेलापूर



ग्रामपंचायत, सत्यमेव जयते ग्रुप तसेच बेलापूर-ऐनतपूर ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा परिषद सदस्य शरद नवले, बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी धनश्री विखे पाटील बोलत होत्या. यावेळी वड, पिंपळ, आंबा, टिकोमा, सप्तपर्णी, लिंब, स्पॅथोडिया, बकुळ अशा २००० वृक्षरोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष दीपक पटारे, बाजार समितीचे संचालक गिरीधर आसने, भाऊसाहेब बांद्रे, डॉ. शंकर मुठे, रामराव शेटे, सरपंच मिना साळवी, उपसरपंच प्रियंका कुन्हे, सदस्य चंद्रकांत नवले, मुश्ताक शेख, जालिंदर कुन्हे, रणजित श्रीगोड, ॲड. अरविंद साळवी, देविदासदेसाई, प्रफुल्ल डावरे, भास्करराव खंडागळे, विष्णुपंत डावरे, भाऊसाहेब कुताळ, साहेबराव मोकाशी दादा, अरविंद साळवी, शफिक बागवान, सुभाष अमोलिक, बाळासाहेब दाणी, गोरक्षनाथ कुन्हे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामपंचायतच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

प्रास्ताविकात अभिषेक खंडागळे म्हणाले की, बेलापूर-ऐनतपूर गावांच्या विकासात ना. विखे पाटील यांचे सततचे व मोलाचे योगदान आहे. १२६ कोटींची पाणीपुरवठा योजना, साठवण तलाव, घरकुले, विविध समाज घटकांची स्मशानभूमी, क्रिडांगण, सेंद्रिय खत प्रकल्प इत्यादी कामांसाठी ना. विखे यांनी ४३ एकर जमीन ग्रामपंचायतीस मोफत दिली आहे. याशिवाय नुकतेच १००१ घरकुलांनाही मंजुरी मिळवून दिली आहे. यात डॉ. सुजय विखे पाटील यांचेही सतत सहकार्य लाभले.

# आदर्शगाव हिवरेबाजारमध्ये नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आदर्शगाव हिवरेबाजार जि. प. प्राथमिक शाळा आणि यशवंत माध्यमिक विद्यालय या शाळेत सोमवार (दि.१६) शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने शाळेत इयत्ता पहिली, पाचवी, आठवी आणि इतर वर्गात प्रथमच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि रंगीबेरंगी फुगे देऊन स्वागत करण्यात आले.



यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक ठाणगे, प्रास्ताविक विजय ठाणगे यांनी केले. उपस्थित विद्यार्थ्यांना शालेय मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले तसेच पाटी पेन्सिल, पट्टी, अंकलिपी, आणि गोड जेवणही देण्यात आले. पद्मश्री डॉ. पोपटराव पवार म्हणाले की, नवागतांना शाळेची भीती वाटते आणि कुतुहलही वाटते. यावेळी पवार यांनी पूर्वीचे शाळेचे अनुभव कथन केले.

पूर्वी शाळांना शेणाने सारवले जायचे, पूर्वी दहावीपर्यंत शाळेत जाताना चप्पल, फुल पॅन्ट नसायची, अकरावीला गेल्यावर स्लीपर आणि फुल पॅन्ट मिळायची तसेच मुलांना हरिपाठ, वृक्षारोपण, सहल, खेळ इ. विषयांचे मार्गदर्शन केले. तर व्यसन आणि मोबाईल पासून दूर राहण्यास सांगितले.

यावेळी नगरचे तहसीलदार राजेंद्र शिंदे, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समितीचे वसंत बिनवडे व सर्व स्टाफ, सरपंच विमलताई ठाणगे, अध्यक्ष अर्चना ठाणगे, सहदेव पवार, एस.टी पादीर, रो. ना. पादीर, दत्तात्रय ठाणगे, पालक, ग्रामस्थ व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# न. पा. शाळेत नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** कोपरगाव नगरपरिषद संचलित सर्व नगर परिषद शाळेतील शैक्षणिक वर्षाची सुरुवात सोमवारपासून सुरू झाली. यामध्ये नगर परिषद संचलित न. पा. शिक्षण मंडळ शाळा क्रमांक १, ३, ४, ६ या शाळांसह माधवराव कचेश्वर आढाव माध्यमिक व तांत्रिक विद्यालया मधील नवीन विद्यार्थी यांचा शाळा प्रवेशोत्सव व स्वागत कार्यक्रम कोपरगाव नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी मनोजकुमार पापडीवाल, प्रशासन अधिकारी श्रीराम थोरात, कर निरीक्षक श्रीमती सोनवणे, रामराव



जाधव यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व फुलांचा वर्षाव करत दिप ओवाळून करण्यात आले.

सदर कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शालेय जीवनातले शिक्षणाचे महत्व याबाबत मार्गदर्शन केले. भावी आयुष्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तसेच १ ली ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पाठय पुस्तके, शुज व सॉक्सचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक भावना खैरनार यांनी केले तर सूत्रसंचालन अर्चना बोराडे यांनी केले तर आभार स्नेहल वाघचौरे यांनी मानले. सदर कार्यक्रमा प्रसंगी न. पा. शाळा क्रमांक १, ३, ४, ६ चे मुख्याध्यापक मंगल तरवडे -बिबवे, रंजनी गायकवाड -खैरनार, सविता साळुंके व खान आदी सह सर्व शाळांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# दोन मुख्य संशयित पुण्यातून अटकेत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** तपोवन रस्ता येथे २ जून रोजी घडलेल्या गोळीबाराच्या प्रकारणातील दोन प्रमुख संशयित आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुणे येथून ताब्यात घेऊन अटक केली आहे. भिमराज गेणुजी आव्हाड (वय ५८, रा. नित्यसेवा, पाईपलाईन रस्ता, सावेडी) आणि राहुल विजय सांगळे (वय ३३. रा. शिवनगर, सावेडी) अशी अटकेतील दोघांची नावे आहेत. फिर्यादी प्रमोद रामदास घोडके (रा. ढवण वस्ती, तपोवन रस्ता) २ जून रोजी तपोवन रस्ता येथून औषध घेण्यासाठी जात असताना, संशयित आरोपींनी त्यांना थांबवून 'तु ऋषी ढवण याच्यासोबत का राहतो, या कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती. त्यानंतर भिमराज आव्हाड याने पिस्तूलमधून दोन गोळ्या झाडल्या होत्या. या घटनेनंतर तोफखाना पोलीस ठाण्यात खूनाचा प्रयत्न, आर्म ॲक्ट आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याप्रकरणी आधी चार संशयितांना तोफखाना पोलिसांनी अटक केली आहे. मुख्य सूत्रधार भिमराज आव्हाड आणि त्याचा साथीदार राहुल सांगळे हे पसार होते. त्यांचा अटकेसाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते. पथकाने पुणे जिल्ह्यातील केसनंद भागात सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. भिमराज आव्हाड याच्यावर याआधीही मोक्कांतर्गत गुन्हा दाखल असून तो सध्या जामिनावर होता. तर राहुल सांगळे याच्याविरुद्ध दंगा आणि मारहाणीचे दोन गुन्हे आधीपासूनच दाखल आहेत.

# प्रवरेच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नोकरी

## प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी येथील केमिकल इंजिनिअरिंग विभागाच्या २०२५ बॅचच्या सर्व विद्यार्थ्यांना शंभर टक्के प्लेसमेंट मिळाले असून हा विभाग आणि महाविद्यालयासाठी अभिमानास्पद क्षण आहे. या यशामुळे महाविद्यालयाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या आपल्या ध्येयाला पुन्हा एकदा सिद्ध केले आहे अशी माहीती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली. केमिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सुनील मिसाळ यांनी सांगितले की, केमिकल इंजिनिअरिंगच्या २०२५ मधील ४० विद्यार्थ्यांची नामांकित आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची प्लेसमेंट झाली. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण विद्यार्थी हा सक्षम घडावा, यासाठी कौशल्य विकास, व्यवस्थापन कौशल्य, प्रक्षेत्र भेटी, मुलाखात संवाद कौशल्य आणि माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन वेळोवेळी विद्यार्थ्यांना देतानाच औद्योगिक क्षेत्रात बदलत असलेल्या तंत्रज्ञानाचे ज्ञान दिले जाते. यामुळे ग्रामीण विद्यार्थी हा परिपूर्ण होता. संस्थेच्या माध्यमातून विविध कंपन्या आणि औद्योगिक क्षेत्राबरोबर संलग्नता करार याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे साठी मदत होते. विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंट होण्यासाठी केमिकल विभागाचे सर्व प्राध्यापक तसेच प्लेसमेंट समन्वयक प्रा. मनोज परजणे, प्लेसमेंटचे प्रमुख डॉ. अण्णासाहेब वराडे व प्रा. नितीन चव्हाण, प्रा. राजेंद्र निंबाळकर यांनी परिश्रम घेतले.

# रेणुका माता देवस्थान जुन्या ट्रस्टच्याच ताब्यात

## उच्च न्यायालयाचे आदेश, मंदिर परिसरात विश्वस्तांचा जल्लोष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नागापूर, एमआयडीसी येथील रेणुका माता देवस्थानचे जुन्या ट्रस्टला धर्मदाय आयुक्त पुणे यांनी दिलेल्या मान्यतेनंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने देखील जुन्या ट्रस्टला मान्यता दिल्याचा आदेश दिला आहे. या निकालानंतर मंदिरात रेणुका माता देवीची आरती करुन मंदिर परिसरात ट्रस्टचे पदाधिकारी व विश्वस्तांनी जल्लोष केला. प्रारंभी ट्रस्टच्या पदाधिकारी व विश्वस्तांच्या हस्ते आरती करण्यात आली.

एकमेकांना पेढे भरवून फटाक्यांची आतषबाजीत



जल्लोष करण्यात आला. यावेळी अधिकृत ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त गोरख कातोरे, राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर यांच्यासह राधाकिसन कातोरे, गंगाधर वाकळे, नगरसेवक दत्तापाटील सप्रे, नवनागापूर सदस्य नाना दांगट, ज्ञानदेव सप्रे आदींसह भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागापूर, एमआयडीसी येथील रेणुका माता देवस्थानची सन २००२ मध्ये ट्रस्ट स्थापन करण्यात आली. या ट्रस्टमधील काही संचालकांनी बंडखोरी करून, २०१९ साली नवीन ट्रस्टची स्थापना केली होती. जुने ट्रस्ट विरोधात नवीन ट्रस्टचा वाद निर्माण झाला होता. याप्रकरणी धर्मदाय आयुक्तांकडे अध्यक्ष प्रभाकर भोर व सचिव दत्तात्रय विटेकर यांनी दावा दाखल केला होता. याप्रकरणी अंतिम सुनावणीसाठी प्रकरण पुणे धर्मदाय आयुक्तांकडे पाठविण्यात आले. याप्रकरणी तीन वर्षे सुनावणी होऊन २४ मार्च २०२३ रोजी पुणे धर्मदाय आयुक्तांनी मंदिराचे जुने ट्रस्टला मान्यता देऊन नव्याने स्थापन झालेल्या ट्रस्टची मान्यता नाकारली होती.

या निकालानंतर नवीन ट्रस्टच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अपिल करण्यात आले होते. या प्रकरणात देखील अध्यक्ष प्रभाकर भोर व सचिव दत्तात्रय विटेकर यांनी ट्रस्टच्या वतीने न्यायलयीन लढा दिला. न्यायमुर्ती किशोरे सी. संत जे. यांनी नुकतेच जुन्या ट्रस्टची मान्यता कायम ठेवण्याचा आदेश दिला आहे. या प्रकरणात ट्रस्टच्या वतीने ॲड. नंदकिशोर गरुड ॲड. विवेक ढगे, ॲड. शिवराज कदम यांनी कामकाज पाहिले. पुणे चॅरिटी कमिशनर येथील कामकाज ॲड. शिवराज कदम यांनी पाहिले.

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे समोरील कामकाज (दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे अधिनियम क्रमांक ५ नियम २० अन्वये जाहिर नोटीस)

**जाहिर नोटीस**

क. कावि/कु. का/९९९/२०२५
पाथर्डी, दि. १७/०६/२०२५.

अर्जदार : **श्री. रमेश प्रभाकर काळे व इतर**
रा. माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी.

**विषय :- मौजे माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी येथील गट नं. ७० बाबत जाहिर नोटीस**

उपरोक्त अर्जदार यांनी या कार्यालयाकडे अर्ज सादर करुन मौजे माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी येथील गट नं.७० क्षेत्र १.२० हे. आर आहे. मौजे माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी येथील गट नं.७० मध्ये अनेक पोटहिस्से पडलेले असलेमुळे सदर क्षेत्राचा ताळमेळ बसत नाही, सबब, सदर क्षेत्रामध्ये तफावत आढळून येत असलेबाबत अर्जदार यांनी कळविले आहे. त्यानुसार महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार त्यांचे नाव अधिकार अभिलेखामध्ये दाखल करुन क्षेत्र दुरूस्ती करणेसाठी अर्जदार यांनी इकडेस अर्ज सादर केला आहे.

विषयांकित मिळकतीमध्ये खरेदी विक्री व इतर नोंदणीकृत व्यवहार झालेले असलेचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे; परंतु झालेल्या संपूर्ण व्यवहाराच्या नोंदी तलाठी दप्तरामध्ये परिपूर्णरित्या झाल्या आहेत किंवा कसे? याबाबत शहानिशा करणे आवश्यक आहे. त्यामुळे या जाहिर नोटीसव्दारे तमाम लोकाना कळविण्यात येत आहे की, सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालय अथवा प्राधिकरणासमोर वाद चालू असल्यास अथवा खरेदी, गहाण, दान, बक्षिसपत्र, जप्ती, बैंक बोजा, भाडेकरार, विसारपावती, साठेखत, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी किंवा इतर कोणताही वाद चालू असल्यास तसेच बँक अगर पतसंस्थेचा बोजा अगर हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांसाठी दि.१/०७/२०२५ रोजी सायं. ५.०० वाजेपावेतो तहसिलदार पाथर्डी यांचे कार्यालयात पुराव्यासह लेखी म्हणणे सादर करावे. मुदतीत कोणाचीही हरकत किंवा लेखी म्हणणे प्राप्त न झाल्यास, कोणाचे काहीएक म्हणणे नाही असे समजून उपलब्ध अभिलेखाचे आधारे गुणवत्तेवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ नुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल३ याची नोंद घ्यावी.

**सही/-**
तहसिलदार, पाथर्डी



# बालांगण

## हा आहे दोन्हीतला फरक



रस्त्यावरून प्रवास करताना आपल्याला फ्लायओव्हर आणि ओव्हरब्रिज असे शब्द अनेकदा ऐकायला मिळतात. बऱ्याच वेळा आपण हे दोन शब्द एकच समजतो आणि फरक न जाणून घेता त्यांचा वापर करतो. पण तुम्हाला माहिती आहे का की, उड्डाणपूल आणि ओव्हरब्रिज या शब्दांचा अर्थ वेगवेगळा असून वेगवेगळ्या गरजांनुसार ते बांधले जातात? चला, आज याविषयी जाणून घेऊ या.

*** उड्डाणपूल म्हणजे काय?**

उड्डाणपूल हा एक प्रकारचा पूल असून तो रस्ते किंवा रेल्वे रुळांवर बांधला जातो. त्याचा मुख्य उद्देश कोणत्याही अडथळ्याशिवाय वाहतूक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे हा असतो. वर्दळीच्या चौकातून बरीच वाहने येत-जात राहतात. अशावेळी उड्डाणपूल बांधला तर काही वाहने खाली रस्त्यावरून धावतात आणि काही वाहने उड्डाणपूलावरून जातात. यामुळे चौकात वाहतूक कोंडीची समस्या बऱ्याच प्रमाणात कमी होते. उड्डाणपूल सहसा लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी बांधले जातात. ते शहरांमध्ये किंवा बाहेरील भागात असू शकतात. वाहने जलद आणि सुरक्षितपणे जाऊ शकतील,

**महत्त्वाचे काही...**

अशाप्रकारे त्याची रचना केली जाते.

*** ओव्हरब्रिज म्हणजे काय?**

ओव्हरब्रिज हा देखील एक प्रकारचा पूलच आहे, परंतु त्याचे मुख्य काम पादचाऱ्यांना किंवा कमी वेगाने जाणाऱ्या वाहनांना रस्ता किंवा रेल्वे मार्गावरून मार्ग उपलब्ध करून देणे हे असते. तुम्ही अनेकदा रेल्वे स्थानकांवळ पादचाऱ्यांसाठी बांधलेले पूल पाहिले असतील. ते ओव्हरब्रिज असतात.

ओव्हरब्रिजचा उद्देश सुरक्षितता सुनिश्चित करणे हा असतो. हे पूल वर्दळीचे रस्ते किंवा धोकादायक रेल्वे रुळ ओलांडण्याचे टाळण्यासाठी कामी येतात. ओव्हरब्रिज सामान्यतः उड्डाणपुलांपेक्षा लहान असतात आणि पादचाऱ्यांना आणि सायकलस्वारांना सामावून घेण्यासाठी डिझाइन केलेले असतात.

## ताप आलाय?

मित्रांनो, वातावरणातल्या बदलामुळे विविध आजार डोकं वर काढतात. या दिवसात तर फ्लूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होते. फ्लू म्हणजे नेमकं काय हे जाणून घेऊ या. इन्फ्लूएंझाला 'फ्लू' असं म्हटलं जातं. ताप, थंडी, खोकला, अंगदुखी, डोकेदुखी अशी याची लक्षणं असतात. इन्फ्लूएंझा विषाणूमुळे या विकाराची लागण होते. या फ्लूविरोधात लस उपलब्ध आहे. सहा महिन्यांपेक्षा जास्त वयाचे कोणीही ही लस घेऊ शकतात. रोगप्रतिकारक्षमता कमी असल्याने लहान मुलांना हा विकार होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे तुम्हा मुलांनी ही लस टोचून घ्यायला हवी. नऊ वर्षांपेक्षा मोठ्या मुलांना एकदा दिलेली लस पुरते पण त्यापेक्षा लहान मुलांना दोनदा लस द्यावी लागते. पाच वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांना फ्लू होण्याची शक्यता सर्वात जास्त असते. तसंच मधुमेह, अस्थमा किंवा इतर गंभीर आजार असलेल्या मुलांना फ्लू होऊ शकतो.

फ्लू हा साथीचा आजार आहे. हा विषाणू हवेच्या माध्यमातून पसरतो. फ्लू झालेल्या व्यक्तीच्या शिंकण्यातून किंवा खोकल्यातून हा विषाणू हवेत पसरतो आणि श्वासावाटे निरोगी व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करतो. त्यामुळे खोकल्यानंतर किंवा शिंकल्यानंतर



**आरोग्य जपा**

हात स्वच्छ धुवून घ्यायला हवेत.

पण फ्लू झाला तरी काळजी करायचं कारण नाही. औषधोपचार आणि थोड्या विश्रांतीनंतर तुम्ही बरे होता. फ्लूचं निदान झालं तर डॉक्टरांनी दिलेली औषधं वेळेवर घ्या. आराम करा. भरपूर पाणी प्या. ताजी फळं आणि हिरव्या भाज्या खा. फारच बरं वाटत नसेल, श्वास घ्यायला त्रास होत असेल तर आई-बाबांना सांगा.

## पोटात कावळे का ओरडतात?



छोट्या दोस्तांनो, कधीकधी अचानक तुमच्या पोटातून आवाज येता का? पोटात गुडगुड वाजते का? थोडक्यात पोटात कावळे ओरडतात का? खरंतर सगळ्यांनाच कधी ना कधी हा अनुभव येत असतो. म्हणूनच यामागील कारण आज जाणून घेऊ या.

मुलांनो, पोटातून येणारा हा आवाज भूक लागल्याचे लक्षण आहे. पोट रिकामे असते तेव्हा स्नायू आकुंचन पावतात. यामुळे आतील वायू आणि पचन द्रव बाहेर काढता येतो. स्नायूंच्या या हालचालीमुळे पोटातून आवाज येतो. या प्रक्रियेला 'पेरिस्टॅलिसिस' म्हणतात. ही हालचाल नेहमीच सुरू असली तरी पोट रिकामे असताना आवाज अधिक मोठा येतो. रिकाम्या पोटी स्नायू आकुंचन पावतात तेव्हा या हालचालीमुळे निर्माण होणारा आवाज मोठ्याने बाहेर येतो. यामध्ये भूक लागण्याचे संप्रेरक 'घ्रेलिन' देखील भूमिका बजावते. घ्रेलिन भूकेचा हार्मोन असून तो शरीराला अन्नाची गरज असल्याचे संकेत देतो. स्वाभाविकच पोट रिकामे होताच या हार्मोनची पातळी वाढते. यामुळे पोटाचे स्नायू जलद आकुंचन पावतात. म्हणूनच गुरगुरण्याचा आवाज अधिक मोठा होतो.

**हे होते कशामुळे?**

हा आवाज कमी करण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे काहीतरी खाणे. खाल्ल्याने हा आवाज ताबडतोब कमी होतो. अर्थात पोटाच्या स्नायूंची हालचाल सुरूच राहते.

## संवाद वाढवा, मैत्र जोडा



छोट्या मित्रांनो, अनेकांना नवीन व्यक्तीशी बोलताना थोडेसे घाबरायला होते. आजूबाजूला कोणी अनोळखी असेल तर अस्वस्थ वाटते आणि संभाषण सुरू करण्यास अडचण येते. तुम्हालाही असे होते का? होत असेल तरी घाबरु नका. ही एक सामान्य समस्या आहे आणि काही सोप्या टिप्सच्या मदतीने तुम्ही हा संकोच दूर करू शकता. चला जाणून घेऊ या.

मुलांनो, गोड हास्य हा कोणाशीही संभाषण सुरू करण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. तुम्ही एखाद्या अनोळखी व्यक्तीकडे बघून हसता तेव्हा मैत्रीपूर्ण असल्याचे दाखवता. तुम्ही त्यांच्याकडे लक्ष देत आहात आणि तुम्हाला त्यांच्याशी बोलायचे आहे, हे या कृतीतून तुम्ही दाखवता आणि संभाषण सुकर होते.

तुम्ही छोटासा प्रश्न विचारूनही सहजपणे संभाषण सुरू करू शकता. प्रश्न विचारल्याने समोरच्या व्यक्तीला बोलावेसे वाटते आणि तुम तुम्ही भीतीही कमी होते. तुम्हाला चांगले बोलायचे असेल तर आधी चांगले ऐकले पाहिजे. म्हणूनच कोणी तुमच्याशी बोलत असेल तर ते काय म्हणत आहेत याकडे लक्ष द्या. संबंधित प्रश्न विचारा. यावरून या व्यक्तीला आपल्या बोलण्यात खरोखर रस आहे आणि तुम्ही ते महत्त्वाचे

**कसे वागावे?**

मानता, असे समोरच्या व्यक्तीला कळते. लक्षपूर्वक ऐकल्याने संभाषण सुरू राहते आणि मैत्री वाढते.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आत्मविश्वासाचा तुमच्या संभाषणावर खूप मोठा प्रभाव पडतो. त्यामुळेच थोडे घाबरले असाल तरी आनंदी दिसण्याचा प्रयत्न करा आणि तुमचा स्वतःवर विश्वास आहे हे दाखवा. सरळ उभे राहा, स्पष्ट बोला. आवाज उत्साही ठेवा. लक्षात ठेवा, प्रत्येकजण कधी ना कधी अनोळखी असतो आणि बहुतेक लोकांना नवीन लोकांना भेटणे आणि त्यांच्याशी बोलणे आवडते. तेव्हा तुम्हीही मैत्रीसाठी हात पुढे करा.

## गुणकारी अंजीर



मुलांनो, खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि अयोग्य जीवनशैलीमुळे अनेकजण अनेक प्रकारच्या आजारांना बळी पडतात. आजार जडल्यास डॉक्टरांकडे जावे लागते. औषधे घ्यावी लागतात. हे टाळण्यासाठी तुम्ही आत्तापासून आहाराकडे लक्ष द्यायला हवे. निरोगी राहण्यासाठी तुम्ही सुका मेवा खायला हवा. तुमच्यापैकी अनेकांना तो आवडतही असेल.

मुलांनो, सुकामेवा खाण्याचे बरेच लाभ मिळतात. पण तुम्हाला माहिती आहे का, की एक असेही ड्रायफ्रूट आहे हे भिजवलेले पाणी प्याल्यास अनेक समस्यांपासून मुक्तता मिळू शकते. हो, आपण अंजीरांबद्दल बोलत आहोत. अंजीरमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॅल्शियम, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी, व्हिटॅमिन के, फायबर, प्रथिने, जस्त आणि लोह यासह अनेक पोषक घटक आढळतात. म्हणूनच अंजीर पाण्यात भिजवून ते पाणी पिल्यास शरीराला अनेक महत्त्वपूर्ण घटक मिळतात.

अंजीरचे पाणी पिल्याने पचनसंस्था चांगली कार्य करते. यामुळे अन्न सहज पचते. हे पाणी डिटॉक्स ड्रिंकसारखे काम करते. दररोज सकाळी रिकाम्या पोटी अंजीर भिजवलेले पाणी प्यायल्याने दिवसभर ऊर्जावान वाटू शकते. त्यात नैसर्गिक साखर असल्यामुळे विशेष लाभ होतो.

**माहिती आहे?**

## घरीच बनवा फळांची बास्केट



छोट्या दोस्तांनो, फळांची बास्केट तुम्ही घरीही बनवू शकता. कल्पकतेचा वापर करून फळांची ही बास्केट सजवता येईल. आज संत्र्यांची बास्केट कशी बनवायची हे शिकू या. साहित्यः मोठ्या आकाराचा कागद, केशरी रंगाचे कागद, केशरी पुठ्ठे (वेगवेगळ्या रंगांचे आणि डिझाइनचे केशरी कागद घ्या.), लाल कागद, गम, स्टिकर तसंच सजावटीच्या इतर वस्तू

कृती: कप किंवा छोट्या प्लेटचा वापर करून केशरी कागदांवर गोल आकार काढा. हे गोल कापून घ्या. तुमच्याकडच्या लाल कागदाचा वापर करून बास्केट किंवा बाउलचा आकार कापून घ्या. बास्केटला तुम्ही आवडीचा आकार देऊ शकता. लाल कागदाचा बाऊल मोठ्या कागदावर चिकटवा. आता लाल बाऊलच्या वरच्या भागावर केशरी गोल चिकटवा. हे केशरी गोल म्हणजे संत्री आहेत. बाऊलमध्ये संत्री ठेवली आहेत असं वाटायला हवं, मित्रांनो. बाऊल सजवण्यासाठी स्टीकर्स किंवा इतर वस्तूंचा वापर करता येईल. याच प्रकारे तुम्ही वेगवेगळ्या फळांचे आकार कापून टोपली सजवू शकता.

**कार्यानुभव**

## पर्यावरण रक्षणासाठी...

छोट्या दोस्तांनो, बांधकाम करण्यासाठी विटा लागतात. पण सिमेंट-कॉंक्रिटच्या विटांमुळे पर्यावरणाचं नुकसान होऊ शकतं. म्हणूनच आता पर्यावरणपूरक म्हणजे इको-फ्रेंडली विटा तयार करण्यात आल्या आहेत. 'इंडियन स्कूल ऑफ डिझाइन ॲंड इनोव्हेशन'मधल्या शास्त्रज्ञांनी बरंच संशोधन करून या विटा तयार केल्या आहेत. या विटा तयार करण्यासाठी माती, सिमेंट, चारकोल आणि ऑरगॅनिक लुफ्फा फायबरचा वापर करण्यात आला आहे. या विटांमध्ये सिमेंट असलं तरी कॉंक्रिटच्या विटांच्या तुलनेत त्याचं प्रमाण बरंच कमी आहे. 'ग्रीन चारकोल ब्रिक्स' असं नाव या विटांना देण्यात आलं आहे. या विटांमध्ये हवा खेळती राहण्यासाठी छोट्या पोकळ्या तयार करण्यात आल्या आहेत. या पोकळ्या पाण्याच्या टाकीप्रमाणे काम करतात. या पोकळ्यांमुळे विटांमध्ये पाणी साठून रहातं आणि विटांचं तापमान कमी होतं. यामुळे घरात थंडावा जाणवतो. विटांच्या पृष्ठभागावर थोड्या प्रमाणात चारकोलचा वापर करण्यात आला आहे. हे चारकोल हवेतलं नायट्रेट शोषून घेऊन हवा शुद्ध करतं.



**माहिती आहे?**

या विटा खूप हलक्या आहेत. तसंच त्या अगदी पटकन नष्टही होऊ शकतात. त्यामुळे बांधकामासाठी या विटांचा वापर होणं गरजेचं आहे. वातावरणात कार्बन डाय ऑक्साइडचं प्रमाण वाढत चाललं आहे. यामुळे जागतिक तापमानवाढीची समस्या निर्माण होते. सिमेंटमुळे कार्बनच्या उत्सर्जनात वाढ झाली आहे. सध्याच्या काळात प्रत्येकानेच पर्यावरणाचं रक्षण करणं गरजेचं आहे.

**चित्र रंगवा**



## गावाची गोडी वाढवा



मित्रांनो, 'गावाकडे चला' असं गांधीजी म्हणाले होते. गावाला गेल्यावर किती बरं वाटतं. गावात फार गर्दी नसते, प्रदूषण नसतं. गावातली नदी, हिरवळ, शेणाने सारवलेलं घर, शेती हे सगळं हवंहवंसं वाटतं. काही दिवस गावाला जाऊन आल्यावर कसं ताजंतवानं वाटतं. गावच्या हवेत ही जादू असते मित्रांनो. भारताच्या ग्रामीण भागात बरंच काही घडत असतं. इथलं वातावरण, जगणं सगळंच वेगळं असतं. शहरातल्या जीवनासारखी धामधूम इथे नसते. या सगळ्याचा अभ्यास करून तुम्ही करीअर घडवू शकता. 'बॅचलर ऑफ रुरल स्टडीज' हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही ग्रामीण जीवनाकडे वेगळ्या दृष्टीकोनातून बघू शकता. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण भागातलं जीवन तुम्हाला अगदी जवळून पाहता येईल. विकासकामांमध्ये सहभागी होता येईल. भारताचा ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास होणं गरजेचं आहे. यात तुमचा हातभार लागू शकतो. शेती, सामाजिक विकास, पशुपालन, जंगलांचा विकास, पर्यावरणाचं व्यवस्थापन अशा विविध

**कोण होणार?**

आघाड्यांवर तुम्ही काम करू शकता. ग्रामीण भागाशी संबंधित विविध विषयांचा या अभ्यासक्रमात समावेश असतो. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरीच्या विविध संधी उपलब्ध होतात. सरकारी, खाजगी तसंच सार्वजनिक क्षेत्रात तुम्ही काम करू शकता.

**ठिपके जुळवा**



### स्मार्ट टिप्स

#### अशी थांबवा उचकी



दोस्तांनो, उचकी लागली की खूप अस्वस्थ वाटतं. उचकी लागल्यावर आपण घटाघट पाणी पितो. आपल्याला वर बघायला सांगितलं जातं. उचकी थांबवण्यासाठी काही घरगुती उपायही करता येतील. उचकी लागल्यावर साखर खा. पाण्यात थोडं मीठ घालून प्या. घोट घोट पाणी प्या. हळूहळू श्वास घ्या. यामुळे बरं वाटेल.

### खादाडी

#### चविष्ट पिटा पिझ्झा



मित्रांनो, पिझ्झा खायला कोणाला आवडत नाही? तुम्ही घरच्या घरी मस्त पिझ्झा बनवू शकता. यासाठी पिटा ब्रेड, स्पॅगेटी सॉस आणि मोझरेला चीज असं साहित्य लागेल. सर्वात आधी पिटा ब्रेड घ्या. त्यावर स्पॅगेटी सॉस पसरवा. थोडं चीज सॉसच्या वर पसरवा. आता हा ब्रेड ओव्हनमध्ये ठेवा. मिनिटभर बेक करा आणि खा. संध्याकाळी काय खायचं असा प्रश्न पडत असेल तर पिटा पिझ्झा हा स्मार्ट ऑप्शन आहे.

### दोस्त हे मस्त



#### असा आहे ॲनाकोंडा

ॲनाकोंडा हा साप असून तो ॲमेझॉनच्या जंगलात आढळतो. ग्रीन ॲनाकोंडा हा जगातला सर्वात मोठा साप आहे. त्याची लांबी जवळपास २० फूट असते. तसंच हा सर्वात वजनदार साप आहे. तो दक्षिण अमेरिकेत आढळतो.

### वाचा तर खरं

#### वाढतायंत चक्रीवादळं



दोस्तांनो, जगभरातच अनेक वादळं येत असतात. १९७० मध्ये पूर्व पाकिस्तान म्हणजे आजच्या बांग्लादेशमध्ये 'भोला' नावाचं वादळ आलं होतं. या वादळाने बरंच नुकसान केलं होतं. १९९१ मध्ये बांग्लादेशमध्ये 'मेरियन' नावाचं वादळ आलं होतं. १९७४ च्या 'नीना' या वादळानेही कहर केला होता. अशा नैसर्गिक आपत्ती कमी करण्यासाठी आपण पर्यावरणाचा विचार करायला हवा.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11